www.rajdand.com
सातारा/पुणे, बुधवार
07.02.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । माघ कृ 17
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

# अजित पवार गटाला घड्याळ चिन्ह आणि पक्षही

## शरद पवार यांना मोठा धक्का

**मुंबई :** गेल्या सहा महिन्यांत पार झालेल्या १० हून अधिक सुनावणींनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी आणि घड्याळ चिन्ह बहाल केलं आहे. अगदी शिवसेना पक्षात फूट पडून अभूतपूर्व परिस्थितीनंतर निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांना शिवसेना आणि धनुष्यबाण बहाल केला होता. त्याचप्रमाणे निवडणूक आयोगाने विधिमंडळातील बहुमत लक्षात घेऊन अजित पवार यांच्या गटाला पक्ष आणि चिन्ह सोपवल्याने निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार यांना मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे.





राष्ट्रवादी पक्षात फूट पडल्यानंतर राष्ट्रवादी कुणाची आणि घड्याळ कुणाचं? हा वाद निवडणूक आयोगात पोहोचला होता. गेली सहा महिने यावर निवडणूक आयोगात सुनावणी सुरू होती. या सुनावण्यांसाठी स्वतः शरद पवार निवडणूक आयोगात हजर राहायचे तर अजित पवार यांच्या गटाच्या वतीने सुनील तटकरे आणि इतरही महत्त्वाचे नेते सुनावण्यांसाठी हजर असायचे. अखेर सहा महिन्यांच्या सुनावणीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीबाबतचा निर्णय जाहीर केला आहे. निवडणूक आयोगाचा निर्णय आपण नम्रपणे स्वीकारत असल्याची प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली. तर निवडणूक आयोगाचा निर्णय धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिलेली आहे.

शरद पवार गटाला ३ पर्यायी चिन्हे पाठवण्यासाठी ७ फेब्रुवारी दुपारी ३ पर्यंत वेळ देण्यात आली आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटाला हा मोठा धक्का मानण्यात येतोय. आगामी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांना त्यांच्या नव्या पक्ष स्थापनेसाठी निवडणूक आयोगाने विशेष सवलत दिली आहे.

बहुसंख्य लोकप्रतिनिधींचा पाठिंबा असल्याचं अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगात सांगण्यात आलं होतं. महाराष्ट्रातले ४१ आमदार आणि नागालँडमधील ७ आमदारांचा अजित पवार यांच्या गटाला पाठिंबा आहे. तसेच लोकसभेतील २ खासदारांनी अजित पवार गटाला पाठिंबा दिलेला आहे तर एका खासदाराने दोन्ही गटाला शपथपत्र दिलेलं आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील ५ आमदारांनी दोन्ही गटाकडून शपथपत्रे दिलेली आहेत. हेच सारं लक्षात घेऊन निवडणूक आयोगाने अजित पवार यांच्या गटाला राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ हे पक्षचिन्ह बहाल केलं आहे. त्यामुळे शरद पवार गटाला सुप्रीम कोर्टात जाण्याचा आता पर्याय असेल.

**अजित पवार गटाकडून सेलिब्रेशन**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला पक्षचिन्ह आणि निशाणी मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर ठाण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाबाहेर पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला.

## खेड ते मुंबई, उद्धव ठाकरे-रश्मी ठाकरे यांचा 'वंदे भारत'ने हायस्पीड प्रवास



**रत्नागिरी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे पत्नी रश्मी ठाकरे यांच्यासह कोकण दौऱ्यावर होते. चिपळूण येथील सभेनंतर मुंबईला परत येताना ठाकरेंनी रेल्वे मार्गाने परत येणे पसंत केले. ठाकरेंनी वंदे भारत ट्रेनने खेड ते मुंबई प्रवास असा सपत्निक प्रवास केला.

वंदे भारत या सेमी हायस्पीड ट्रेनने उद्धव ठाकरे-रश्मी ठाकरे यांनी खेडहून मुंबई गाठली. यावेळी प्रवासात त्यांच्यासोबत पक्षाचे सचिव मिलिंद नार्वेकर, खासदार विनायक राऊत आणि इतर पदाधिकारी सोबत होते. ठाकरेंच्या रेल्वे प्रवासाचे फोटो सोशल मीडियावर अल्पावधीतच व्हायरल झाले. कोकण दौऱ्यात ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजप आणि शिंदे गटावर सडकून टीका केली.

ह्यपक्षाला ह्यशिवसेनाह्व हे नाव देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असला, तरीही ते नाव काढण्याचा अधिकार आयोगाला नाही. आम्ही शिवसेना हे नाव कोणाला घेऊ देणार नाही. आम्ही निवडणूक आयोगाला दगड्या आयोग असे नाव ठेवले तर चालेल काय,ह्व अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजापूरमधील सभेत निवडणूक आयोगावर टीका केली होती.

'ज्या गद्दारांनी आपले सरकार पडले, त्यांच्या नाकावर टिच्चून मी पुन्हा एकदा शिवसेनेचे सरकार स्थापन करून येत्या लोकसभा निवडणुकीत लाल किल्ल्यावर फडकवून दाखवतो,' असे खुले आव्हान शिवसेना उद्धव ठाकरे यांनी दिले. 'तुम्ही वैभव नाईक आणि खासदार विनायक राऊत यांना निवडून दिले नसते, तर इकडे सगळी गुंडागदी आणि गँगवॉर झाले असते,' अशी टीकाही त्यांनी केली.

उद्धव ठाकरे यांचा दोन दिवसांचा रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हा दौरा झाला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात रविवारी पहिल्या दिवशी सावंतवाडी, कुडाळ, मालवण आणि कणकवली अशा ठिकाणी चार सभा झाल्या. या सगळ्या सभांमधून उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार नारायण राणे, मंत्री दीपक केसरकर यांच्यावर शरसंधान साधले.

## बंदुका कोयता चालवणाऱ्या हातांची घडी; पोलिसांसमोर सगळ्या गँग आमनेसामने



**पुणे :** पुण्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीचं प्रमाण वाढत आहे. अगदी विशीतल्या पोरांनीसुद्धा हातात कोयता आणि बंदूक घेतली आहे. बोलायचं झालं तर पुणे शहरात दररोज काही ना काही, कुठे ना कुठे गुन्हा होत आहे. ज्या पुण्याला शिक्षणाचं माहेरघर मानलं जातं, त्याच पुण्यात तरुणांनी हातात कोयता आणि बंदुक घेऊन नंगानाच चालवला आहे. या सर्व घटनांवर कुठे ना कुठे चाप बसावा, म्हणून आज पुणे पोलीस आयुक्तालयात शहरातील कुख्यात तसेच नामचीन आणि नुकतेच गुन्हेगारीत पदार्पण केलेल्या तरुणांना बोलावण्यात आलं होतं.

पुणे पोलीस आयुक्तालयात सर्व गुंडांची ओळख परेड करण्यात आली. आयुक्तालयात तब्बल २०० ते ३०० गुंडांची पोलिसांकडून परेड करण्यात आली आहे. कुख्यात गजा मारणे टोळी, निलेश घायवळ, गणेश मारणे टोळी, बापू नायर टोळी, उमेश चव्हाण टोळी, बंटी पवार टोळी आणि बाबा बोडकेसह अनेक गुंडांची ओळख करण्यात आली. पुण्यातील गुन्हे शाखेचे पोलीस उपाआयुक्त अमोल झेंडे यांचा गुंडांना हा पहिलाच दणका असल्याचं बोललं जात आहे.

दरम्यान, पार्थ पवारांनी ज्या गुंडाची भेट घेतली तो म्हणजे गजा मारणे त्याची देखील पोलिसांकडून परेड करण्यात आली आहे. तर खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कुख्यात टोळी प्रमुख निलेश घायवळ सोबतचा फोटो ट्विट केला, त्याची देखील पोलिसांनी परेड घेतली आहे. पोलीस उपाआयुक्त अमोल झेंडे यांनी गुन्हेगारी टोळ्यांना अटकाव करण्यासाठी गुन्हे शाखेला सूचना केल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर शहरातील गुन्हेगारी टोळ्यातील प्रमुख आणि साथीदारांना ओळख परेडसाठी बोलावण्यात आले होते.

## निवासी डॉक्टरांचे आजपासून बेमुदत आंदोलन

**मुंबई :** मानधनवाढ, प्रलंबित भत्ते, वसतिगृहांची स्थिती या प्रलंबित मागण्यांसाठी सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करूनही अद्याप पूर्तता न झाल्याने मध्यवती निवासी डॉक्टरांच्या संघटनेने (मार्ड) आज, ७ फेब्रुवारीपासून बेमुदत संपाची हाक दिली आहे. या संपामध्ये सार्वजनिक रुग्णालयांतील निवासी डॉक्टर सहभागी होणार आहेत. पालिकेच्या रुग्णालयांतील निवासी डॉक्टरांचा यात प्रत्यक्ष सहभाग नसेल. आपत्कालीन परिस्थितीमधील वैद्यकीय सेवेवर याचा परिणाम होणार नाही याकडेही निवासी डॉक्टरांनी लक्ष वेधले आहे. सरकारचा निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे असलेला दृष्टीकोन अत्यंत उदासीन असून, डॉक्टरांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेतली जात नाही, अशी खंत संघटनेने व्यक्त केली आहे.

सेंट्रल मार्डने यावषी तीन जानेवारी रोजी सरकारने आश्वासन दिल्यानंतर संप मागे घेतला. मात्र, तरीही सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत. त्याच मागण्यांसाठी विद्यार्थ्यांना पुन्हा



कामबंद आंदोलन करावे लागणार आहे. मात्र, या कालावधीत आपत्कालीन वैद्यकीय सुविधा सुरू राहणार आहेत. त्यांच्यावर कोणताही परिणाम होऊ देणार नाही, असे ह्यमार्डह्वने स्पष्ट केले आहे. जेजे रुग्णालय प्रशासनाने रुग्णसेवा प्रभावित होणार नाही याची संपूर्ण काळजी घेण्यात येणार आहे.

परराज्याच्या प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये वसतिगृहांमधील जागा कमी पडत आहेत. विद्यार्थ्यांची संख्या वाढली पण निवासाची सुविधा वाढली नाही. राहण्याची सुविधा दयनीय आहे. वसतिगृह सुविधेसाठी यापूर्वीही डॉक्टरांनी सातत्याने मागणी केली आहे. प्रत्येकवेळी सरकार आश्वासन देते. मात्र, पुढे ती कागदावर राहतात. विद्यावेतनासाठीही विद्यार्थ्यांना सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. त्यामुळे संघटनेतील विद्याथी डॉक्टरांनी उपस्थित केला आहे. संघटनेमधील सदस्यांनी आतापर्यंत २८ वेळा यासंदर्भात पत्रव्यवहार करूनही समस्या कायम आहे.

- निवासी डॉक्टरांसाठी पुरेशा प्रमाणात वसतिगृहांची व्यवस्था करण्यात यावी
- विद्यावेतनामध्ये वाढ करा
- विद्यावेतन दरमहा १० तारखेपर्यंत खात्यावर जमा करा
- केंद्रीय संस्थांप्रमाणे विद्यावेतनाप्रमाणे देण्यात यावे
- वरिष्ठ निवासी डॉक्टरांसाठी वसतिगृहाची सुविधा

सरकारकडून पूर्तता नाही

ह्यमार्डह्वचे राज्याध्यक्ष डॉ. अभिजीत हेलगे म्हणाले की, आम्ही मागण्यांसाठी मागील काही महिने सातत्याने प्रयत्न करीत आहोत. मात्र, सातत्याने पाठपुरावा करूनही त्याची सरकारने पूर्तता केलेली नाही. सोमवारी आमची बैठक झाली. मात्र, त्यात केवळ तोंडी आश्वासने देण्यात आली. त्यामुळे संपाच्या मुद्द्यावर कायम असून, संपाच्या काळामध्येही आपत्कालीन वैद्यकीय सेवा सुरू राहतील. राज्यातील सहा हजारांपेक्षा जास्त डॉक्टर या संपामध्ये सहभागी होतील. मात्र, पालिका रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी या संपाला पाठिंबा दर्शवला आहे. पालिका रुग्णालयातील वैद्यकीय सेवांवर परिणाम होणार नसल्याचे नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर मेढेकर यांनी सांगितले.

## नाशिकमध्ये जेलरोडमध्ये कुत्र्याचा धुमाकूळ

**नाशिकरोड :** जेलरोड परिसरात शेफर्ड जातीच्या कुत्र्याने चार लहान मुलांना चावा घेतल्याची घटना घडली. जखमी मुलांवर बिटको रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, महापालिकेच्या दोन पथकांनी शनिवारी तीन तास शोध घेऊनही हा कुत्ता आढळला नाही. या कुत्र्याने आणखी काहींना चावा घेतला आहे का, याची माहिती पालिकेचे कमर्चारी घेत आहेत.

जेलरोडच्या वज्रेश्वरी नगर, टाकेकर वसाहत, सातभाई नगर, जेलरोड टाकी परिसरात या कुत्र्याने शुक्रवारी (दि. २)सायंकाळी पाचच्या सुमारास क्लासहून घरी जाणाऱ्या तसेच खेळणाऱ्या चार बालकांना चावा घेतला. पालक आणि रहिवाशी धावून आल्याने मुलांचे प्राण वाचले. अद्वैत शिंदे (वय ८), प्रणव खरोटे (८), ऋषीराज पुरोहित (८), आरोही संवत्सरकर (४) अशी जखमी मुलांची नावे आहेत. त्यांना बिटको रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले. सोमवारपर्यंत (दि. ५) त्यांना डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात येणार आहे.

## टेंभूला प्रशासकीय मान्यता; कोटींचा निधी मंजूर, ९४ गावांची तहान भागणार

**पुणे : सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतील दुष्काळप्रवण सात तालुक्यांना फायदेशीर ठरणाऱ्या टेंभू उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या प्रशासकीय मान्यतेच्या अहवालास राज्य सरकारने मान्यता दिली. तिसऱ्या अहवालानुसार, प्रकल्पासाठी सुमारे सात हजार ३७० कोटी रुपयांना मंजुरी मिळाली. या प्रकल्पाचा लाभ एक लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्राला होणार आहे.**

- हा प्रकल्प कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत येतो.
- प्रकल्पांतर्गत कृष्णा नदीवर टेंभू गावाजवळ बॅराज बांधून विविध टप्प्यांद्वारे २२ टीएमसी पाणी उचलले जाणार आहे.
- याद्वारे सातारा, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांतील सात तालुक्यांतील ८० हजार ४७२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ देण्याचा प्रस्ताव होता.



- प्रकल्पालगतचे उंचीवरील क्षेत्र सिंचनापासून वंचित होते. या क्षेत्राला पाणी देण्यासाठी स्थानिक शेतकरी आणि लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती.
- टेंभू विस्तारित उपसा सिंचन योजनेसाठी पाणी देण्याचा प्रस्ताव सरकारला २०२२मध्ये देण्यात आला होता.

**९४ गावांची तहान भागणार**

अतिरिक्त आठ टीएमसी पाण्यामुळे सिंचनापासून वंचित ९४ गावांना पाणी देण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पामुळे आता सुमारे ३० टीएमसी पाण्याचा वापर नियोजित आहे. टेंभू सिंचन योजनेमुळे सुमारे एक लाख २१ हजार ४७५ हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार आहे, असे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले.

**निरीक्षणे पाहूनच अहवाल मान्य**

बांधकामाची सद्यस्थिती, किंमतवाढीची कारणमीमांसा, प्रकल्पातील कामाच्या अनुषंगाने सिंचनविषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेली निरीक्षणे आणि कार्यवाहीचा आढावा घेऊन उपसा सिंचन प्रकल्पासाठी ७३७० कोटी रुपयांच्या तिसऱ्या प्रशासकीय सुधारित अहवालाला मान्यता देण्याचा निर्णय सरकारने घेतला.

**प्रस्तावाला गेल्या वर्षी मान्यता**

या क्षेत्राला पाणी देण्याच्या प्रस्तावाला सप्टेंबर २०२३मध्ये अंतिम मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार आठ टीएमसी पाणी वापराला मान्यता देण्यात आली. हे अतिरिक्त पाणी टेंभू विस्तारित टप्पा क्रमांक सहा अ आणि ब पळशी उपसा सिंचन योजना, माण व खटाव उपसा सिंचन योजना, टप्पा क्रमांक पाच, बेवनूर वितरिका, कामत गुरुत्व नलिका या कामांचा नव्याने समावेश करून टेंभू योजनेचा विस्तार तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार होणार आहे.

## घरोघरी शौचालय योजनेत 'सात बारा'चा खोडा

### कल्याण, डोबिंवलीतील हजारो कुटुंबे वंचित

**कल्याण :** केंद्र आणि राज्य सरकारच्या स्वच्छ भारत योजनेतून शहर हागणदारीमुक्त करण्यासाठी 'घरोघरी शौचालय' योजना राबवण्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र ज्या घरमालकांच्या नावावर जागेचा सात बारा उतारा आहे, त्यालाच या योजनेचा लाभ घेता येणार असल्याची अट प्रशासनाने घातली आहे. त्यामुळे हजारो गरजू या योजनेपासून वंचित राहिले आहेत. वर्षभरात एकही प्रस्ताव शासनाकडे धाडण्यात आलेला नसताना, योजनेची १०० टक्के फलश्रुती झाल्याचा टेंभा सरकारी स्तरावर मिरवला जात असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

स्वच्छ भारत योजनेतून घराघरात शौचालय बांधण्यासाठी केंद्र सरकारकडून चार हजार आणि राज्य सरकारकडून आठ हजार रुपयाचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात थेट वर्ग केले जाते. या योजनेतून सुरुवातीच्या काळात शेकडो नागरिकांनी घरात शौचालय उभारले. मात्र तत्कालीन आयुक्त भाऊसाहेब दांगडे यांच्या कार्यकाळात या योजनेचा लाभ घेण्यासाठी सात बारा उतारा नावावर असण्याची अट घालण्यात आली आहे. वास्तविक शहरात हजारो बैठ्या चाळी असून १० ते १२ ठिकाणी मोठ्या झोपडपट्ट्या आहेत. या चाळींच्या खोल्यांमध्ये घरात शौचालय बांधणे शक्य आहे. मात्र गरीब नागरिकांना हा खर्च परवडत नसल्याने प्रशासनाने शहरात उभारलेल्या चार हजार ४३८ सार्वजनिक शौचालयांचा वापर नागरिकांना करावा लागत आहे.

या नागरिकांनी स्वच्छ भारत योजनेचा लाभ मिळावा, यासाठी पालिका प्रशासनाकडे मागणी केली असली, तरी सात बारा उताऱ्याची अट पूर्ण करणे त्याना शक्य झालेले नाही. ज्या जागेवर चाळी आहेत, त्या जागेचे सात बारा उतारे विकसकाच्या किंवा स्थानिक गावकऱ्यांच्या नावावरच आहेत. हे विकासक किंवा जागामालक जागेवर चाळी उभारल्यानंतरही आपले हक्क सोडण्यास तयार नाहीत. यामुळे गरज असतानाही लाभ घेता येत नसल्याची गरजूंची तक्रार आहे.

दरम्यान, प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांकडे योजनेसाठी शेकडो नागरिक येत असले, तरी त्यांच्याकडे सात बारा उतारा नसल्याने त्यांचे अर्ज स्वीकारता येत नसल्याचे प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, हजारो नागरिकांची या योजनेतून लाभ मिळवण्यासाठी धडपड सुरू असली, तरी वर्षभरात एकही लाभार्थ्याचा अर्ज स्वीकारलेला नसल्याने सरकारच्या या योजनेपासून हजारो लाभाथी वंचित राहिले आहेत.

मात्र या योजनेसाठी लाभाथी नाहीत, याचा अर्थ १०० टक्के घरांत स्वच्छतागृह बांधून झाले आहे, असा अर्थ आता सरकारकडून काढला जात असल्याने नागरिकांनी आणि समाजसेवकांनी संताप व्यक्त केला आहे. सात बारा उताऱ्याची अट शिथिल केली, तर गरीब गरजूंना या योजनेचा लाभ घेता येईल, अशी प्रतिक्रिया पालिकेचे अधिकारी व्यक्त करत आहेत. पालिका आयुक्त आणि राज्य सरकार याबाबत कोणता निर्णय घेते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# शरद पवार यांची निवड बेकायदेशीर

## अजितदादा गटाने केला होता युक्तिवाद

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस कुणाची? यावर निवडणूक आयोगाकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी अजित पवार गटाकडून शरद पवारांबाबत खळबळजनक आरोप करण्यात आले होते. शरद पवार यांची निवड निवडणुकीच्या माध्यमातून झालेली नाही, एक व्यक्ती बेकायदेशीरपणे पक्ष चालवत आहेत. पक्ष घरच्यासारखा चालवला जात होता. जे निवडून आले नाही, ते नियुक्ती करत होते. त्यांची नियुक्ती वैध कशी म्हणता येईल? असा युक्तिवाद अजित पवार गटाकडून केला गेला.**





शरद पवार यांच्याविरुद्ध बंड झाल्यानंतर बहुसंख्य आमदार आणि पक्षाचे पदाधिकारी यांनी अजित पवार यांचे नेतृत्व मान्य केले. त्यानंतर अजित पवार यांची निवड कायद्याला धरून करण्यात आली आहे. एकच व्यक्ती पक्षावर दावा करू शकत नाही. प्रफुल पटेलांच्या सहीनं सगळ्या नियुक्त्या करण्यात आल्या, प्रफुल पटेल आमच्यासोबत आहेत. विधिमंडळातील बहुमत आमच्याबाजूने, त्याचा विचार करून निर्णय घेण्यात यावा, असा दावा अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगात करण्यात आला.

नेत्यांची प्रतिज्ञापत्र आमच्याकडे आहेत राज्य आणि देशातील पदाधिकारी आमच्यासोबत आहेत. सर्वात जास्त प्रतिज्ञापत्र आमच्याकडे आहेत. महाराष्ट्रातील ४२ आमदारांचा आम्हाला पाठिंबा आहे. नागालँडच्या ७ आमदारांचाही आम्हाला पाठिंबा आहे, असं निवडणूक आयोगात सांगण्यात आलं.

अजित पवार गटाकडून शिवसेना प्रकरणाचा दाखलाही देण्यात आला. प्रत्येक कार्यकर्त्यांची मोजणी शक्य नाही, पक्ष कुणाचा कार्यकर्ते आणि नेते ठरवतात, असा युक्तीवाद अजित पवार गटाकडून केला गेला. पक्षाच्या घटनेनुसार पक्षात काम चालत नाही, पक्ष घटना आणि निर्णय यात बरीच तफावत आहे, असा आरोपही अजित पवार गटाकडून केला गेला.

आम्ही योग्य पद्धतीने प्रतिज्ञापत्र सादर केली आहेत, आमच्या कागदपत्रांमध्ये चूक नाही. ३० जूनला अजित पवारांनी निवडणूक आयोगाकडे पक्षाध्यक्षपदावर दावा करणारं पत्र दिलं. आयोगाने शरद पवारांना ४ वेळा संधी दिली, पण तरीही त्यांना वेळ हवा आहे.

## खासदार अमोल कोल्हेंचे तळ्यातमळ्यात



**मुंबई** : राष्ट्रवादीला खिंडार पाडल्यानंतर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने चर्चेत असलेले एक नाव म्हणजे डॉ. अमोल कोल्हे. अजूनही अमोल कोल्हे द्विधा मनस्थितीत आहेत का? असाच प्रश्न त्यांच्या संशयास्पद भूमिकेवर निर्माण झाला आहे. निवडणूक आयोगाने आज राष्ट्रवादी काँग्रेस चिन्ह आणि पक्ष अजित पवार गटाला दिल्यानंतर जी प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आली आहेत त्यामध्ये एकमेव अमोल कोल्हे असे आहेत ज्यांनी दोन्ही गटाकडे प्रतिज्ञापत्र दिल्याने राजकीय भुवया उंचावल्या आहेत. इतकेच नव्हे तर अजित पवार यांनी राष्ट्रवादी फोडून भाजपच्या मांडीला मांडी लावून बसल्यानंतर ज्यावेळी त्यांचा शपथविधी सोहळा झाला त्यावेळी सुद्धा अमोल कोल्हे उपस्थित राहिले होते. मात्र, नंतर त्यांनी भूमिका स्पष्ट करताना शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर अजित पवार यांनी जाहीरपणे अमोल कोल्हे यांना पाडण्याची भाषा केली होती. त्यानंतर या दोन्ही नेत्यांमध्ये चांगलाच कलगीतुरा रंगला. इतके राजकीय घमासान होऊनही अमोल कोल्हे यांनी दोन्ही गटाकडे दिलेल्या प्रतिज्ञापत्राने राजकीय भूवया उंचावल्या आहेत.

इतकेच नव्हे तर पाच आमदारांनीसुद्धा दोन्ही बाजूने प्रतिज्ञापत्र सादर केली आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला दिल्यानंतर डॉ. अमोल कोल्हे यांची मौन बाळगणे तसेच सोशल मीडियामध्ये व्यक्त न होणे, यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकेवर संशयास्पद वातावरण निर्माण करणारे आहे.

अमोल कोल्हे गेल्या काही दिवसांपासून भाजपविरोधात बोलत असले, तरी त्यांची पक्षाबद्दलची भूमिका अजूनही स्पष्ट झालेली नाही, हेच त्यांच्या मौनातून सूचित होत आहे का? अशी सुद्धा राजकीय वर्तुळात चर्चा आहे. राष्ट्रवादीचा निर्णय अजित पवार गटाच्या बाजूला गेल्यानंतर सर्वच नेत्यांकडून प्रतिक्रिया सुरू असताना अमोल कोल्हे यांच्या ट्विटर हँडलवरती मात्र अजूनही एकही ट्विट झालेले नाही. त्यामुळे अमोल कोल्हे नेमके कोणाचे? असे विचारण्याची वेळ आता आली आहे.

## अखेर कायदेशीर वैधता मिळाली -सुनील तटकरे

"मी केवळ खासदार नाही तर निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्षसुद्धा आहे. निवडणूक



आयोगाने भारतीय लोकशाही प्रणालीवर शिक्कामोर्तब केले आहे. मला विश्वास आहे की, अजितदादा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील एनडीएमध्ये आणि महाराष्ट्राच्या युतीच्या सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. लोकशाहीच्या माध्यमातून निर्णय घेत असताना महाराष्ट्रातील जनतेचे समर्थन मिळत आहे. आज त्याला कायदेशीर वैधता आम्हाला मिळाली. याचे आम्हा सर्वांना खूप समाधान आहे, असे राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे म्हणाले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची रचना

राष्ट्रवादी पक्ष हा राष्ट्रीय ते अगदी जिल्हा पातळीवरच्या समित्यांचा मिळून बनलेला आहे. यामध्ये नॅशनल कमिटी, वर्किंग कमिटी, स्टेट कमिटी, युनियन टेरिटरी कमिटी, रिजनल कमिटी आणि डिस्ट्रिक्ट कमिटी यांचा समावेश आहे. या कमिटीमधले सदस्य, पक्षाचे सदस्य अशा सगळ्यांची मिळून पक्षाची रचना आहे.

घटनेनुसार पक्षाच्या अध्यक्षांना गरजेप्रमाणे कमिटी बनवण्याचा अधिकार आहे. पक्षाच्या घटनेनुसार वर्किंग कमिटीला पक्षाचे सर्वोच्च कार्यकारी अधिकार देण्यात आलेले आहेत. पक्षाने आणि नॅशनल कमिटीने ठरवलेली धोरणे आणि कार्यक्रम राबविण्याचा अधिकार तिला आहे.

वर्किंग कमिटीमध्ये पक्षाचे अध्यक्ष, संसदेमधले पक्षाचे नेते आणि २३ बाकी सदस्यांचा समावेश होतो. या २३ मधील १२ सदस्य हे नॅशनल कमिटीकडून नेमले जातात, तर बाकींची नियुक्ती ही पक्षाच्या अध्यक्षांकडून होते. पक्षाच्या घटनेचा अर्थ लावणे आणि त्या घटनेचा अवलंब करण्यासाठी पावले उचलण्याचाही अंतिम अधिकार वर्किंग कमिटीला देण्यात आलेला आहे. राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष नेमण्याच्या निवडणूक प्रक्रियेचीही घटनेत माहिती आहे. राष्ट्रवादीच्या घटनेनुसार पक्षाचे इतर कोणत्याही पक्षात विलीनीकरण केले जाऊ शकते किंवा पक्ष विसर्जितही केला जाऊ शकतो. पण तसा निर्णय घेण्यात अधिकार हा नॅशनल कमिटीला आहे.

### घड्याळ आणि वेळ दोन्हीही दादांचीच -धनंजय मुंडे

मंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विट करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, "घड्याळ आणि वेळ दोन्हीही दादांचीच! निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे स्वागत! या निकालातून आज आमचा निर्णय योग्यच होता, हे पुन्हा एकदा नियतीने सिद्ध केले. पक्षातील सर्व मान्यवर नेत्यांचे व सहकाऱ्यांचे अभिनंदन. हा विजय लोकशाहीचा."

### निकाल संविधानाला धरून -बावनकुळे

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे माध्यमांशी बोलताना म्हणाले की, 'मी अजित पवारांचे खुप अभिनंदन करतो. त्यांना निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून घड्याळाचे चिन्ह आणि पक्षाचे नाव दिले. निवडणूक आयोगाने आज अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला आहे. जेव्हा आयोगाचा निकाल येतो, तेव्हा तो नियमाप्रमाणे, संविधानाला धरून असतो. ज्यांच्याकडे जास्त लोकप्रतिनिधी आणि जास्त मतदानाचा कौल, त्यांच्याकडे तो निकाल जातो.'

### घटनाक्रम

- १० जून १९९९ – सोनिया गांधींच्या नेतृत्वाला विरोध करून शरद पवार, पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना
- ऑक्टोबर १९९९ – काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीत (यूपीए) सामील आणि महाराष्ट्रात सरकार स्थापन
- २००४ – मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी यूपीएमध्ये सामील – शरद पवार केंद्रात कृषी मंत्री
- २० जून २०१२ – पी. ए. संगमा यांनी राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस सोडली
- मे २०१४ – लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएकडून यूपीएचा पराभव – दहा वर्षांत प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस सरकारमधून बाहेर
- २०१४ पर्यंत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र राज्य सरकारचा भाग
- २०१४ – स्वबळावर लढण्यासाठी राष्ट्रवादीने ऑक्टोबर २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी काँग्रेस पक्षासोबतची युती तोडली
- २०१४ – विधानसभा निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आणि राष्ट्रवादीच्या पाठिंब्याने अल्पमतात सरकार स्थापन – एप्रिल
- २०१९ – लोकसभा निवडणूक – महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांपैकी भाजपला २३, शिवसेनेला १८, काँग्रेसला १ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ५ जागा – ऑक्टोबर २०१९ – महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना आणि राष्ट्रवादी-काँग्रेस युती

– २३ नोव्हेंबर २०१९ – भाजपचे राष्ट्रवादीच्या पाठिंब्याने सरकार स्थापन

**अजित पवार उपमुख्यमंत्री**

- २६ नोव्हेंबर २०१९ – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा राजीनामा – सरकार कोसळले
- २८ नोव्हेंबर २०१९ – शिवसेना आणि काँग्रेससोबत स्थापन झालेल्या महाविकास आघाडीचा भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा राज्यात सत्तेत
- जून २०२२ – शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांचे बंड – शिवसेना-भाजप युतीची पुनर्स्थापना – महाविकास आघाडी सत्तेबाहेर
- जुलै २०२३ – राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट – अजित पवार गट भाजप-शिवसेना सरकारमध्ये सामील
- २०२३- २४ – पक्षाच्या निवडणूक चिन्हाचा वाद – निवडणूक आयोगासमोर ६ महिन्यांत १० वेळा सुनावणी
- ६ फेब्रुवारी २०२४ – निवडणूक आयोगाचा निर्णय – घड्याळ चिन्ह अजित पवार गटाला
- ७ फेब्रुवारी २०२४ – दुपारी ३ वाजेपर्यंत नवीन राजकीय पक्षाच्या नावाचे ३ पर्याय सुचवण्यासाठी शरद पवार गटाला निवडणूक आयोगाकडून सवलत
- ८ फेब्रुवारी २०२४ – राज्यसभेच्या महाराष्ट्रातील ६ जागांच्या निवडणुकीची अधिसूचना जारी होण्याची शक्यता

## अजित पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन -देवेंद्र फडणवीस



केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी पक्षाचे चिन्ह आणि पक्ष अजित पवार गटाच्या स्वाधीन करण्याचा निर्णय मंगळवारी जाहीर केल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तोंडून आपसुक अजित पवार यांच्या अभिनंदनाची प्रतिक्रिया व्यक्त झाली. ते म्हणाले, आमच्या महायुतीतील घटक पक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच घड्याळ चिन्ह म्हणून निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळाली, मी त्यांचे, सर्व सहकारी तसेच कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. २०२३ च्या जुलै महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. तत्कालीन विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सत्ताधारी महायुतीबरोबर जात उपमुख्यमंत्रीपदाचा कारभार स्वीकारला.




केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार गटच खरा राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्ष असल्याचे स्पष्ट करत चिन्ह आणि पक्ष दिल्यामुळे शरद पवार गटाचे मुंबईतील बलार्ड पियर येथील कार्यालय मंगळवारी रात्री ओस पडले होते. (छाया : सलमान अन्सारी)

## पक्षाचा बाप आमच्यासोबत -रोहित पवार

"केंद्रातील महाशक्तीच्या बेलगाम सत्तेचा गैरवापर करून फुटीर गट व्यक्तिगत स्वार्थासाठी पक्ष बळकावण्याचा असंवैधानिक निर्णय घेऊ शकतो. पण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर वाढवणे, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणे, मुंबईचं महत्त्व अबाधित राखण्यासाठी प्रयत्न करणे, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे,



राज्यातील हक्काचे प्रकल्प राज्यातच टिकवून ठेवणे, असे महाराष्ट्राच्या हिताचे कायदेशीर निर्णय केंद्रातील महाशक्तीचा वापर करून सामान्य लोकांच्या हितासाठी मात्र त्यांना घेता येत नाहीत. यातच त्यांची लायकी कळते. आज सत्तेचा गैरवापर करून पक्ष आणि चिन्ह जरी बळकावले असले तरी पक्षाचा बाप आमच्यासोबत आहे," असे शरद पवार गटाचे नेते आणि आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

## उद्धव ठाकरेंसोबतचे अनेक लोकप्रतिनिधी आमच्याकडे येणार

### मला म्हाडा अध्यक्षपद फडणवीसांनी दिले -उदय सामंत

**प्रतिनिधी/मुंबई**

मला म्हाडाचे अध्यक्षपद देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. शिवसेनेत असताना मी मंत्री निश्चितच झालो. पण तेव्हाही माझे नाव कापण्याचे प्रयत्न सुरू होते. तेव्हा सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मिलिंद नार्वेकर यांनी माझे मंत्रिपद त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न केल्यानेच मला मंत्रिपदाची शपथ घेता आली. उद्धव ठाकरे आताच कोकण दौरा करून गेले. पण या दौऱ्यात त्यांच्याच व्यासपीठावर जे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी बसले होते त्यातील अनेक जण आमच्याकडे येणार आहेत. लवकरच त्यांचे पक्षप्रवेश होतील, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

कोकण दौऱ्यात उद्धव ठाकरे यांनी उदय सामंत यांच्यावर टीका केली होती. उदय सामंत यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले आहे. उद्धव ठाकरे आमच्या कौटुंबिक व्यवसायांवर टीका करतात. आम्ही गद्दार असल्याचे म्हणतात. पण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे काँग्रेससोबत कधीच जायचे नाही या मताचे होते. ज्या पक्षासोबत युती करून जनमत मिळविले त्याला सोडून काँग्रेससोबत तर आम्ही गेलो नाही. उलट भाजपसोबतच जाऊन सरकार स्थापन केले. जनमताचाच आदर आम्ही केला. व्यवसाय करूनच गाड्या घेतो. कोणतेही व्यवसाय वा उद्योगधंदे न करता सहा मजल्यांचे घर कोणी बांधले, असा प्रश्न मात्र मी कधीच विचारणार नाही, असे उदय सामंत म्हणाले.

## संस्कृती सामाजिक संस्थेचा रक्तदानातून वर्षपूर्ती सोहळा संपन्न

ठाणे : संस्कृती सामाजिक संस्थेच्या वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन दशरथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, संस्थेच्या वर्षपूतीच्या अनुषंगाने, प्रथम उपक्रम संस्थेचे अध्यक्ष व संस्कृती हॉस्पिटलचे संचालक डॉ. तुषार शेलार, यांच्या संकल्पनेतून रक्तदानाचे शिबिर आयोजित करण्यात आले, तसेच संस्थेचे खजिनदार, व संस्कृती हॉस्पिटलचे संचालिका सौ. डॉ. विवेकी तु.शेलार यांच्या कल्पनेला दिशा मिळाली, संस्थेचे सचिव दिपक सावंत, यांनी सुद्धा खूप मेहनत घेतली. तसेच, पिकनिक मित्रपरिवार व नव समाज विद्यामंदिर मानिवली बॅच दहावी २००२, यांचे सुद्धा विशेष सहकार्य लाभले.

अध्यक्षांच्या विचारातून, पुढील उपक्रम आरोग्य शिबिर, , धार्मिक उपक्रम, क्रीडा, समाजसेवा इत्यादी उपक्रम राबविण्यात येतील, असे त्यांच्या अध्यक्षनीय वकृत्वातून सूचित केले. रक्त संकलन .. संकल्प ब्लड बँक यांच्या माध्यमातून करण्यात आले. एकूण रक्त संकलन. ७० बॅग. झाले,चांगला प्रतिसाद मिळाला

उद्घाटक... श्री. दशरथ पाटील गुरुजी, श्री. निवृत्ती लाटे, अंबाडी अशोक म्हस्कर, अंबाडी विपुल पाटील, अंबाडी विजय शिंदे मोरनी अशोक शिंदे मोरनी वसंत जाधव माडोशी सुभाष साळुंखे माडोशी धोंडीबा जाधव माडोशी अंकुश जाधव माडोशी दिपक चव्हाण लामज राजाराम चव्हान लामज निकम साहेब लामज विनय भोसले, म्हाळुंगे प्रवीण निवळे, निवळी बाळा जाधव, पाचगाव नरेश जाधव, दिनेश सावंत, सचिन जाधव, माडोशी तरुणाचे बहुसंख्येने योगदान लाभले. आदी बहुसंख्य समाज बांधव व प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित राहून, कार्यक्रम चांगल्या प्रतिसादाने पार पडला.



दैनिक राजदंड

प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक नियुक्त करण्याबाबत TRAINEE REPORTERS, SUB-EDITORS पाहिजेत

पत्रकारितेतील **मानदंड ठरणाऱ्या दै. राजदंडची (MARATHI) पुणे आवृत्ती आणि THEDEMOCRAT.LIVE (ENGLISH)** नुकतीच सुरू झाली आहे. शहर व जिल्ह्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग विश्वातील बदलाची माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्याचा या वृत्तपत्राचा मानस आहे. प्रिंट, ऑनलाईन, युट्यब या माध्यमात राजदंड मीडिया समूहाचे काम चालणार आहे.

पत्रकारितेत करिअर करू पाहणाऱ्या युवक-युवतीसाठी **दै. राजदंडचे** व्यासपीठ दिशादर्शक ठरणार आहे. नवोदित पत्रकारांना हा महत्वाचा प्लॅटफार्म आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना **दै. राजदंडमध्ये** संधी उपलब्ध करून देत आहे. तरी याची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावी, ही विनंती.

कल्पना सुर्वे,
**संचालक,** (HR) दै. राजदंड, पुणे
email: rajdand.pune@gmail.com

**मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-**rajdand.pune@gmail.com
**या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.**

# पक्षवाढीसाठी काम करा अन्यथा पद सोडा; शिवसेना नेत्यांची पदाधिकाऱ्यांना तंबी



**अहमदनगर :**अगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात रिक्त जागांवर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करा, नवीन शाखा उघडा तसेच शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तळमळीने काम करा. ज्या पदाधिकाऱ्यांना पक्षाच्या ध्येयधोरणाप्रमाणे काम करायचे नाही त्यांनी पद सोडावे, त्यांच्या जागी चांगले काम करणाऱ्यांना संधी दिली जाईल. पदधिकाऱ्यांना अशी तंबी शिवसेनेचे (शिंदे गट ) नगर दक्षिण लोकसभा निरिक्षक अभिजित कदम यांनी दिली.येथील शासकीय विश्रामगृहात सोमवारी (दि.५) कदम यांनी शिवसेनेच्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावेळी पक्षाचे सचिव तथा विभागीय संपर्क प्रमुख भाऊसाहेब चौधरी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, अनिल शिंदे, संपर्क प्रमुख सचिन जाधव, शहर जिल्हाध्यक्ष दिलीप सातपुते, आनंद शेळके, दामोदर भालसिंग, आमोल हुंबे आदींसह तालुका प्रमुख, महिला आघाडी प्रमुख, युवा सेना प्रमुख व इतर पदाधिकारी उपस्थित होते. होते. नगर शहरात पुढील महिन्यात खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थित मेळावा घेतला जाणार आहे. या संदर्भातील पूर्वतयारी, पदाधिकाऱ्यांची नवीन नियुक्ती करणे तसेच पदाधिकाऱ्यांनी सुचविलेली कामे शासकीय निधीतून होतात नाही आदींबाबत कदम यांनी सूचना केल्या. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी तक्रारींचा पाढा वाचनाला. यामध्ये प्रामुख्याने सरकारी कार्यालयात शिवसैनिकांची कामे होत नाहीत, अधिकारी ऐकत नाहीत. अशा स्वरुपाच्या या तक्रारी होत्या. या तक्रारींची नोंद घेऊन त्यावर कार्यवाही केली जाईल असे कदम यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. दरम्यान कदम व चौधरी यांनी प्रत्येक तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेतली. जिल्ह्यात पक्षवाढीसाठी संघटनेची बांधणी करावी, मुख्यमंत्र्यांनी सर्वसामान्यांसाठी सुरू केलेल्या योजना तळागळातील घटकांपर्यंत पोहोचतात की, नाही याची दक्षता घ्यावी. तसेच ज्या पदाधिकाऱ्यांना संघटनेत काम करण्यासाठी वेळ नाही त्यांच्या जागी चांगले काम करणाऱ्यांना संधी द्या, अशा सूचना नगर येथे झालेल्या बैठकीत जिल्हा प्रमुखांना दिल्या आहेत.

## रविवारी साताऱ्यात रंगणार जाणता राजा महानाट्य

**सातारा :** जिल्हा परिषद मैदान, सातारा येथे रविवार ११ फेब्रुवारी रोजी सायं. ६ वाजता भव्यदिव्य राजधानी गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सोहळ्यात मृण्मयी देशपांडे, प्राजक्ता गायकवाड, जुईली जोगळेकर, ह्यषीकेश जोशी, भारत गणेशपुरे, रोहित राऊत, रसिका सुनील, रसिका सुनील, सागर कारंडे, नमिता पाटील यांचा सहभाग असणार आहे.

त्याचबरोबर पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांच्या प्रतिभेतून आणि लेखणीतून साकार झालेल्या महानाट्यामधील रोमहर्षक शिवराज्याभिषेक सोहळा साकारण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# नागठाणे येथे भीषण आग

### एकवीस लाखांचा ऐवज जळून खाक

**नागठाणे :** नागठाणे ता.सातारा येथील तारळे रोड चौकातील श्री गणेश राजपुरोहित स्वीट मार्ट दुकानाला आज सकाळी शॉर्ट सर्किट की ? सिलेंडर स्पोटमूळे भीषण आग लागली हे अद्याप समजू शकेले नाही पण मिळालेल्या माहिती नुसार ही आग गॅस सिलेंडर स्फोटा मुळे घडली असा संशय व्यक्त होत आहे.



या आगीत संपूर्ण दुकान जळून भस्मसात झाले.या आगीत दुकानासह सर्व साहित्य जळून खाक झाले.यामुळे प्रचंड नुकसान झाले. याबाबत घटनास्थळ व पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार नागठाणे येथील चौकात जीवनसिंह विजयसिंह राजपुरोहित यांचे स्वीटमार्ट चे दुकान आहे.मंगळवारी सकाळी ७ च्या दरम्यान त्यांच्या दुकानातील कामगारांनी दुकान उघडले यावेळी दुकानातील लाईट च्या बोर्ड मधून त्यांना धूर येताना दिसला. यावेळी कामगारांनी तिथून घाबरून पळ काढला.यावेळी दुकानाला आग लागली पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले. ही आग शेजारी असणाऱ्या लाकडाच्या दुकानाला तसेच जवळील लाकडाच्या वखारी कडे सरकू लागली.यावेळी आगीच्या ज्वाळा व धुरामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळावरून धुराचे मोठे लोट दिसू लागले. यावेळी लोकांची प्रचंड गर्दी झाली.परिसरात असणाऱ्या खेळाच्या मैदानातील काही युवकांनी अग्निशामक बंब ला पाचारण केले.अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना चा अग्निशामक बंब तसेच सातारा नगरपालिका अग्निशामक दल तसेच बोरगाव पोलीस स्टेशन चे कर्मचारी या ठिकाणी दाखल झाले. सुमारे दीड तासाच्या अथक प्रयत्नाने ही आग आटोक्यात आणण्यास यश आले या आगीत दुकानातील काउंटर,फ्रिज,कोल्ड्रिंक फ्रिज,आईस्क्रीम फ्रिज सर्व कपाटे,बॅटरी,इन्व्हर्टर सीसीटीव्ही सर्व मिठाईचा माल असे सुमारे २१लाख रुपयांचे नुकसान झाले.



# यात्रेनिमित्त लाखो भाविक त्र्यंबकेश्वर या ठिकाणी दाखल

**नाशिक :** संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यात्रा यात्रेनिमित्त लाखो भाविक त्र्यंबकेश्वर या ठिकाणी दाखल होत आहे. शहरातील मध्यवर्ती बसस्थानकात भाविकांनी त्र्यंबककडे जाणाऱ्या बसेससाठी गर्दी केली आहे. अनेक भाविकांना श्री निवृत्तीनाथांच्या दर्शनाची ओढ लागली आहे. भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता सिटीलींकच्यावतीने सोमवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी तपोवन डेपोच्या ३ वनाशिकरोडडेपोच्या ११ अशा एकूण १४ जादा बसेसचचे नियोजन केले असून एकूण ९० अतिरिक्त बसफेऱ्या करण्यात येणार आहे. संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांच्या चरणी लाखो भाविक नतमस्तक होतात. यात्रेकरता लाखो भाविकांची होणारी गर्दी व भाविकांना संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांचे दर्शन घेण्यासाठी जाता यावे यासाठी नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंकच्या वतीने जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.सद्यस्थितीत सिटीलिंकच्या वतीने नाशिकरोड ते त्र्यंबकेश्वर व निमाणी ते त्र्यंबकेश्वर या मार्गावर दैनंदिन २८ बसेसच्या माध्यमातून एकूण १८० बसफेऱ्या होतात. परंतु यात्रेदरम्यान ६ व ७ फेब्रुवारी दोन दिवस या अतिरिक्त बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या दोनही दिवशी दैनंदिन २८ व अतिरिक्त ११ अशा एकूण ३९ बसेसच्या माध्यमातून २७० बसफेऱ्या करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त भाविकांनी या जादा बसेसचा लाभ घेण्याचे आवाहन सिटीलींकच्या वतीने करण्यात आले आहे.

# बालगृहातील प्रवेशितांचा जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सव संपन्न

**सातारा :** सातारा जिल्हयात कार्यरत बालगृहातील अनाथ, निराधार, उमागी, विधी संघर्षग्रस्त मुले/मुली यांचे अंगी असलेल्या विविध कला गुणांना वाव मिळण्याचे दृष्टीने सातारा जिल्हयातील बालगृहात दाखल असलेल्या व इतर विदयालयातील प्रवेशितांच्या जिल्हास्तरावरील चाचा नेहरू बालमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

बाल महोत्सवामध्ये स्पधोमध्ये खो-खो, कबड्डी, क्रिकेट, १०० मिटर धावणे, २०० मिटर धावणे, ४०० मिटर धावणे, रिले, गोळाफेक, थाळी फेक, लिंबू चमचा, संगित खुर्ची, उंच उडी, लांब उडी, इत्यादी क्रिडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. बौध्दिक स्पधोमध्ये बुध्दीबळ, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, समूह गीते या स्पर्धा पार पडल्या.

समारोप कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून एस.बी. सावरकर, प्रमुख न्यायदंडाधिकारी, बाल न्याय मंडळ, सातारा व बाल कल्याण समितीचे अध्यक्षा व इतर सदस्य उपस्थित होते. बालकांनी भविष्याची सुरुवात पहिल्या पायरीपासुन करणे आवश्यक असुन त्यासाठी कष्ट व जिद्द अंगी ठेऊन तसेच परिस्थितीवर मात करणे आवश्यक आहे, असे अध्यक्षीय भाषणामध्ये श्री. सावरकर यांनी सांगितले.

# सातारा जिल्हा परिषदेला मिळाल्या प्रथमच आयएएस महिला अधिकारी

**सातारा :** सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी यांची बदली झाली असून त्यांच्या जागी आता याशनी नागराजन यांची नियुक्ती झाली आहे. नागराजन या मंगळवारीच पदभार स्वीकारणार आहेत. तर यामुळे जिल्हा परिषदेला प्रथमच महिला आएएस अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली आहे. नगाराजन या आता ३६ व्या मुख्य कार्यकारी अधिकारी ठरल्या आहेत.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी ज्ञानेश्वर खिलारी यांची सवा वर्षापूर्वी नियुक्ती झाली होती. त्यांनी सर्व विभागात समन्वय ठेवून कामे केली. घरकुल तसेच शिक्षण,



आरोग्य विभागातील अनेक विषय मार्गी लावले. आता त्यांची बदली पुणे येथे इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागात झाली आहे. खिलारी यांच्या जागी याशनी नागराजन यांची नियुक्ती झाली. नागराजन या २०२० च्या आएएस अधिकारी आहेत. सध्या त्या यवतमाळ जिल्ह्यात सहायक जिल्हाधिकारी तसेच पांढरकवडा येथील आदिवासी विभागात प्रकल्प अधिकारी होत्या. तेथून त्यांची मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. त्या साताराच्या ३६ व्या तसेच पहिल्या मुख्य कार्यकारी अधिकारी ठरल्या आहेत. त्या तमिळनाडू राज्यातील आहेत. यापूर्वी त्यांनी भारतीय रिझर्व बँक तसेच विदेशन मंत्रालयातही काम केले आहे.सातारा जिल्ह्यात काम करण्यासारखे खूप आहे. कृषी क्षेत्रातही काम करण्यासाठी वाव आहे.

मिळणाऱ्या कार्यकालात लोकांची कामे मार्गी लावण्याला प्राधान्य असेल. त्याचबरोबर महिला आणि शाळा या विषयीही अधिक कामे करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

# वाराई वसुलीविरोधात चक्का जाम करणार

### सांगलीतील बैठकीत वाहतूकदार संघटनांचा एल्गार

**सांगली:** मालवाहतुकीमध्ये जबरदस्तीने वसूल केल्या जाणाऱ्या वाराईविरोधात दंड थोपटण्याचा निर्णय वाहतूकदार संघटनेच्या बैठकीत झाला. सांगली, शिरोळ, सातारा, कराड, कोल्हापूर, वाठार येथील सर्व वाहतूकदार संघटनांची बैठक रविवारी सांगलीत झाली. यावेळी मोठ्या संख्येने वाहतूक व्यावसायिक उपस्थित होते.

मालवाहतूक क्षेत्रातील समस्या, ओव्हरलोड, भाड्याचे दर, भ्रष्टाचार आदी विषयांवर बैठकीत चर्चा झाली. या समस्या सोडविण्यासाठी तिन्ही जिल्ह्यांतील संघटनांनी



एकत्र येण्याचा निर्णय झाला. कोल्हापूर जिल्हा लॉरी ऑपरेटर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष जाधव म्हणाले, ज्याचा माल, त्याचा हमाल धोरण राबवावे, अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय नाही. सांगलीचे बाळासाहेब कलशेट्टी म्हणाले, वाराईविरोधातील कृती आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. त्याची त्वरित अंमलबजावणी व्हावी.

दरम्यान, वाराईविरोधात प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांत चक्का जाम करण्याचा इशारा संघटनेने दिला. धरणे आंदोलनही करण्याचे ठरले. बैठकीचे संयोजन सांगली जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनने केले. ट्रक, टेम्पो, बस, टँकर महासंघाचे माजी अध्यक्ष प्रकाश गवळी यांनी पुढील लढाईसाठी एकजुटीचे आवाहन केले. ऑल इंडिया मोटार काँग्रेसचे कार्यकारी संचालक बाळासाहेब कलशेट्टी यांनी सांघिक लढ्याची रूपरेषा स्पष्ट केली. स्वाभिमान एकता मालवाहतूक संघटनेचे अध्यक्ष शंकरराव चिंचकर ताकदीने लढा देण्याचे आवाहन केले.



# २६ हजार शेतकरी विम्यापासून वंचित?

**छत्रपती संभाजीनगर ; सोयगाव :** सोयगाव तालुक्यात खरिपात २६ हजार २५५ शेतकऱ्यांनी पीकविमा उतरविला आहे. परंतु, विमा कंपनीच्या बेजबाबदार धोरणामुळे शेतकरी अद्यापही पीकविम्यापासून वंचित आहेत. तालुक्यात खरिपाच्या कपाशीसह सात पिकांचे दुष्काळामुळे ८० टक्के नुकसान झाल्याचा अहवाल कृषी आणि महसूल विभागाने दिला होता. असे असतानाही पीकविमा कंपनीकडून पीकविमा मंजुरीसाठी उंबरठा उत्पन्नाचा निकष लावण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला आहे.

तालुक्यात यंदाच्या खरिपात २६ हजार २५५ शेतकऱ्यांनी पीकविमा काढला आहे. त्यापैकी पीकविमा कंपनीच्या सूचनेनुसार नुकसानीच्या ७२ तासांत २३ हजार ५२४ शेतकऱ्यांनी पोर्टलवर नुकसानीच्या तक्रारी नोंदविल्या आहे. परंतु, तक्रार नोंदविलेल्या शेतकऱ्यांनाही अद्यापही पीकविम्याची रक्कम मिळाली नाही. पीकविमा कंपनीकडून अजूनही निकषावर निकष लादण्यात येत आहेत. त्यामुळे तक्रार केलेल्या शेतकऱ्यांनी या प्रकाराबाबत रोष व्यक्त केला आहे.

दरम्यान, नुकसानीची तक्रार न केलेल्या दोन हजार ७३१ शेतकऱ्यांना कंपनीकडून उंबरठा उत्पन्नाची अट अनिवार्य केली आहे. एकीकडे कृषी आणि महसूलने शासनाला दिलेल्या खरिपाच्या ८० टक्के नुकसानीचा अहवाल पीकविमा कंपनीला मान्य नाही. त्यामुळे उंबरठा उत्पन्न ठरवूनच या ऑफलाइन असलेल्या शेतकऱ्यांना पीकविमा देण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. उत्पन्नच हाती नाही. मग उंबरठा उत्पन्नाची अट कशाला, असा प्रश्न निर्माण होत आहे.

# जून-जुलैमध्ये शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा?

### मे अखेर निवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या मोठी; जुनी पेन्शन 'या' शिक्षकांनाच लागू

**सोलापूर :** मेअखेर सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील २३२ जण सेवानिवृत्त होणार आहेत. त्यात उपशिक्षक, शिक्षक, मुख्याध्यापक, विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुखांचा समावेश आहे. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची तालुकानिहाय यादी जिल्हा परिषदेने तयार केली आहे. मेअखेर राज्यातील अंदाजे पाच हजारांवर शिक्षक निवृत्त होतील.

सोलापूरसह राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमधील ७० टक्के शिक्षकांची पदभरती सुरू आहे. सर्व जिल्हा परिषदांनी 'पवित्र' पोर्टलवर रिक्त पदांच्या जाहिराती अपलोड केल्या असून आता दोन-तीन दिवसांत प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांना या टप्प्यातील भरतीतून जवळपास १३ हजार शिक्षक मिळणार आहेत. दरम्यान, ३१ मेपर्यंत सोलापूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील २३२



जण सेवानिवृत्त होणार असून त्यात उपशिक्षक, शिक्षक, मुख्याध्यापकांसह केंद्रप्रमुख, विस्ताराधिकाऱ्यांचा समावेश आहे.

सोलापूरसह राज्यातील जिल्हा परिषदांमधील ही संख्या पाच ते साडेपाच हजारांपर्यंत आहे. त्यामुळे जून-जुलै महिन्यात शिक्षक भरतीचा दुसरा मोठा टप्पा जाहीर होवू शकतो अशी आशा तरुण-तरुणींना लागली आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमधील मोहोळ व मंगळवेढा तालुक्यातील प्रत्येकी २७, उत्तर सोलापुरातील सात, पंढरपूर तालुक्यातील १७, करमाळ्यातील १४, सांगोल्यातील २४, बार्शीतील २६, अक्कलकोटमधील १३, दक्षिण सोलापुरातील ३७, माळशिरसमधील २४ व माढ्यातील १६ शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्ताराधिकारी अशी पदे रिक्त होणार आहेत. प्राथमिक शिक्षण विभागात मनुष्यबळ कमी असतानाही अवघ्या दोन कर्मचाऱ्यांनी ही यादी तयार केली असून निवृत्तीनंतर संबंधितांना काही दिवसांत पेन्शन सुरू व्हावी, यादृष्टीने देखील त्यांनी तयारी केली आहे.

## जुनी पेन्शन 'या' शिक्षकांनाच लागू

महाराष्ट्र राज्य सरकारकडून सरकारी कर्मचारी व शिक्षकांसाठी जुनी पेन्शन योजना मान्य करण्यात आली आहे. त्यानुसार १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सरकारने जाहिरात दिलेल्या आणि त्यावेळी निवड केलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. शिक्षक भरतीची जाहिरात १ नोव्हेंबर २००५ पूर्वीची आहे, पण त्या शिक्षक तथा सरकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती नोव्हेंबर २००५ नंतर झालेली असेल त्यांना जुनी पेन्शन लागू होणार आहे. त्यासाठी त्यांना पर्याय देण्यात आले असून जुनी पेन्शन की नवीन पेन्शन योजनेचा लाभ पाहिजे, यापैकी एक पर्याय त्या कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांत निवडावा लागणार आहे.

# भरडधान्य कृषी महोत्सवाचे आयोजन

**नांदेड :** आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पौष्टिक तृणधान्य योजनेतंर्गत ज्वारी, बाजरी, नाचणी, राजगिरा, इत्यादी भरडधान्यांचे पोषणमूल्य आणि आहारातील महत्व या जनजागृतीसाठी नांदेडमध्ये बुधवारी (ता. सात) आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान 'रोड शो'चे आयोजन करण्यात आले आहे. तसेच भरड धान्यविषयक जिल्हास्तरीय महोत्सव आणि प्रदर्शन सकाळी दहा ते सायंकाळी सात वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे होणार आहे.



बुधवारी सकाळी 'रोड शो'मध्ये कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होणार आहेत. तसेच महोत्सवात भरडधान्यावर आधारित ४० ते ४५ स्टॉल लावण्यात येणार आहेत. यात नाचणी, ज्वारी, बाजरी, राजगिरा, इत्यादी धान्य तसेच हुरडा, नाचणीचे लाडू, बिस्किट्स, राजगिरा पापड, लाह्या, धपाटे तसेच भरडधान्यावर आधारित खाद्य पदार्थांची विक्री करण्यात येणार आहे. सोबतच इतर कृषी उत्पादने देखील विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत.

महोत्सवात कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, महाबीज, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, सेंद्रीय उत्पादक शेतकरी सहभागी होणार असून भरडधान्यांचे लागवड तंत्रज्ञान, भरडधान्यांचे पोषणमूल्य आणि आहारातील महत्त्व इत्यादी विषयी कृषी शास्त्रज्ञ आणि आहारतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# त्या दूध संस्थाना दुग्ध विकास विभागाकडून नोटीस

## दुध उत्पादकांची फसवणूक न थांबवल्यास कायदेशीर कारवाई ला सामोरे जावे लागणार

### जिल्ह्यातील सर्वच दूध संस्थाना परिपत्रकीय सूचना

**शिरोळ:** शिरोळ तालुक्यातील दानोळी व उदगाव येथील दुध संस्थावर अचानक धाडी टाकून दुग्ध विकास विभागाने मागील आठवड्यात तपासणी केली होती त्यामध्ये या संस्था दुध उत्पादकांची वजनात व फॅट एस एन एफ मध्ये फसवणूक करत असल्याचे या तपासणीत अधिकाऱ्यांना आढळून आले होते.

या अनुषंगाने तपासणी झालेल्या संस्थाना कामकाज सुधारण्याच्या व खुलासा सादर करण्याच्या नोटीस देण्यात आल्या आहेत.

**त्याचबरोबर जिल्ह्यातील सर्वच दूध संस्थाना**

१० मिली अक्युरशी चे काटे वापरण्याचे व त्या काट्यावर येणारे वजन उत्पादकांच्या वहीत लिहिले पाहिजे. उत्पादकांच्या वहीत फॅट एस एन एफ लिहून त्यानुसार दुधाचे बिल द्यावे.

२० मिली पेक्षा जास्त दुध फॅट काढण्यासाठी घेऊ नये.

या महत्वाच्या व अन्य सूचना दुग्ध विकास विभागाकडून करण्यात आल्या आहेत.

आंदोलन अंकुश च्या पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील सर्वच दुध उत्पादकांना यामुळे न्याय मिळणार असून जोपर्यंत उत्पादकांची संघ व संस्थाच्या कडून होणारी लूट थांबत नाही तोपर्यंत आमचा पाठपुरावा सुरु राहणार असल्याचे आंदोलन अंकुश प्रमुख धनाजी चुडमुंगे यांनी सांगितले आहे.

## राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम संपन्न

**सातारा :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बॉम्बे रेस्टॉरंट चौक सातारा या परिसरात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त स्वाती इथापे, डॉ. दिव्या परदेशी उपस्थित होत्या. समाज कल्याणचे सहायक आयुक्त नितीन उबाळे आदी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या शासकीय कार्यालयाचा परिसर तंबाखू मुक्त करण्याचा संकल्प पुर्णत्वास नेहण्याचा दृढ संकल्प अंमलात आणण्याचे दृष्टीने उपस्थितांनी मार्गदर्शन केले.

# रेल्वेरुळांलगत गटाराच्या पाण्यावर पिकतात भाज्या

# प्रशासन काही बोलणार की नाही?

**मुंबई :** रोज सकाळी ऑफिस वेळेत गाठण्यासाठी मुंबईकर लोकलच्या गर्दीत स्वत:ला झोकून देतात. एकापाठोपाठ स्टेशन मागे टाकत लोकल पुढे सरकते. या प्रवासात रेल्वेरुळालगत हिरवाईने नटलेले भाज्यांचे छोटेछोटे मळे दिसतात. त्यात असतो पालक, लाल माठ, मेथी आणि तत्सम भाजीपाला. कॉंक्रीटच्या जंगलात ही हिरवळ डोळ्यांना सुखावणारी असली तरी याच भाज्या मुंबईकरांच्या ताटात पडतात तेव्हा त्या आरोग्याला घातक ठरतात, असा आक्षेप अनेक वर्षे घेतला जात आहे. मात्र यावर कोणालाही गंभीरपणे संशोधन करावे असे वाटत नाही, असे संशोधन चालू असेल तर त्याचे निष्कर्ष रेल्वे प्रशासनाला सांगावे वाटत नाही. रेल्वेरुळांच्या बाजूला तरारलेले विषारी सांडपाण्यावर पोसलेले हे भाज्यांचे मळे रोज मुंबईकरांच्या ताटात भाजी बनून जात आहेत.

दादर ते परळ दरम्यान, मानखुर्द, कुर्ला, मुलुंड तसेच कळवा येथे मोठ्या प्रमाणात गटारीच्या पाण्याचा वापर भाजीपाला पिकविण्यासाठी केला जातो. मुंबई विभागात १२५ हून अधिक ठिकाणी हा असा भाजीपाला पिकवला जातो. येथून ठिकठिकाणी या भाजीपाल्याची विक्री केली जाते.

रेल्वेरुळांलगत विषारी सांडपाण्याच्या जोरावर भाजीपाला पिकविण्याचे प्रकार ठाकुर्ली, कल्याण येथेही सर्रास चालत आहेत. मुळा, पालक, मेथी, कांदेपात अशा भाज्यांचा त्यात समावेश असतो. वांगीही पिकवली जातात, पण ती हॉटेलात पाठविली जातात.

प ठाकुर्ली, कल्याणला जाताना पत्रिपुलनजीक, कळव्याला जाताना बोगदा सोडला की त्या बाहेरील जागेत भाजी पिकवली जाते. पावसाच्या दिवसात पावसाचे पाणी मिळते, मात्र मिळेल त्या पाण्याने ही भाजी पिकवली जाते. खाडीच्या पाण्याचा वापर केला जातो. काही वर्षांपूर्वी या अशा भाज्या पिकवून नागरिकांचे आरोग्य धोक्यात घालणाऱ्या भाजी विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली होती.

प रेल्वे मार्गालगतच्या झोपडपट्टीतील रासायनिक कारखान्यांनी सोडलेले सांडपाणी, अन्य उत्पादनांकरिता वापरून मोकळ्या जागेत सोडलेले पाणी याचा वापर करुन भाज्या पिकविल्या जातात.

अशी पालेभाजी लवकर पिकते, आणि ती लगेच काढून तिची जुडी बनवून नजीकच्या पाण्यात बुडवून स्वच्छ करायची आणि ती बोचकी बाजारात विक्रीसाठी पाठवली जाते.

विषारी गोष्टी पोटात जाण्याची शक्यता

रेल्वे रुळांच्या दुतर्फा असणाऱ्या भागात ज्या भाज्या पिकविल्या जातात. त्याला बऱ्याचदा रसायनमिश्रित पाणी दिले जाते. त्या भाज्या खाल्ल्यानंतर कॅन्सर होतो किंवा नाही याबाबत अद्याप वैद्यकीय शास्त्रात काही नमूद केलेले नाही. मात्र त्या पाण्यावरील भाज्यांमुळे लेड किंवा अन्य विषारी गोष्टी पोटात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रेल्वे रुळालगतच्या जमिनीवर भाजीपाला पिकवण्यासाठी घरगुती आणि उद्योगधंद्यांमधील सांडपाण्याचा वापर केला जातो. सांडपाणी खूपच प्रदूषित असेल तर अशा सांडपाण्यावर भाजी उगवत नाही. मात्र अनेक वेळा जेव्हा सांडपाण्याचा फ्लो कमी किंवा ज्या सांडपाण्यात प्रदूषण कमी निदर्शनास येईल, असे सांडपाणी भाजी पिकवण्यासाठी वापरले जाते. ती भाजी आपल्या जेवणात आली तर आपल्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. रक्तावर परिणाम होऊ शकतो. मूत्रपिंडावर परिणाम होऊ शकतो.



> गेल्या २५ वर्षांपासून रेल्वे रुळालगत भाजीपाला पिकविला जातो. त्याबाबत न्यायालयात खटलाही दाखल करण्यात आला होता. परंतु जागांवरील अतिक्रमण रोखण्यासाठी भाजीपाला लावला जातो, असे रेल्वेकडून सांगण्यात येते. पण भाजीपाल्यासाठी केमिकल फॅक्टरीतून सोडण्यात आलेले विषारी पाणी वापरले जाते. तपासणीत हा भाजीपाला घातक असून त्याने कॅन्सरसारखे आजार होऊ शकतात, असे समोर आले आहे. तरीदेखील रेल्वे कारवाईबाबत ढिम्म असून मुंबईकरांच्या जीवाशी खेळ सुरू आहे.
> 
> - मधु कोटियन, अध्यक्ष, मुंबई रेल्वे प्रवासी संघ

> गेल्या २५ वर्षांपासून रेल्वे रुळालगत भाजीपाला पिकविला जातो. त्याबाबत न्यायालयात खटलाही दाखल करण्यात आला होता. परंतु जागांवरील अतिक्रमण रोखण्यासाठी भाजीपाला लावला जातो, असे रेल्वेकडून सांगण्यात येते. पण भाजीपाल्यासाठी केमिकल फॅक्टरीतून सोडण्यात आलेले विषारी पाणी वापरले जाते. तपासणीत हा भाजीपाला घातक असून त्याने कॅन्सरसारखे आजार होऊ शकतात, असे समोर आले आहे. तरीदेखील रेल्वे कारवाईबाबत ढिम्म असून मुंबईकरांच्या जीवाशी खेळ सुरू आहे.
> 
> - मधु कोटियन, अध्यक्ष,ल्वे प्रवासी संघ

**वर्षभरात एकही कारवाई नाही**

रेल्वेमार्गालगतचे भाज्यांचे मळे आणि त्यांची विषाक्तता या विषयावर माध्यमांनी सातत्याने आवाज उठवला, प्रवाशांनी आंदोलने केली तरी थातूरमातूर कारवाईपलीकडे मध्य रेल्वे प्रशासनाने कारवाई केली नाही. गेल्या वर्षभरात तर यासंदर्भात एकही कारवाई झाल्याची नोंद नाही. त्यामुळेच विषारी पाण्यावर पोसले गेलेले हे भाज्यांचे मळे सुखेनैव डोलत आहेत.

मुंबई व उपनगरांत रेल्वे मार्गालगतची जागा रेल्वेच्या मालकीची आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांना माफक शुल्क आकारून ही जमीन भाडेपट्टीने देण्यात येते. भाज्या पिकविण्यासाठी चांगल्या पाण्याचा वापर करावा, ही अट असते. परंतु ती पाळली जात नाही.



# अजित पवार यांनी पक्ष काढून निवडणूक लढवावी

## जितेंद्र आव्हाड यांचे आव्हान

**ठाणे :** अजित पवारयांनी बारामतीमध्ये भाषण करताना आपणच निवडणुकीत उभे आहोत, असे समजून मतदान करा, असे आवाहन केले आहे. शिवाय, निवडणूक आयोगात सादर केलेल्या प्रमाणपत्रात शरद पवार यांना हुकूमशहा म्हटले आहे. जर, शरद पवार हे हुकूमशहा आहेत तर त्यांनी स्थापन केलेला पक्ष आणि त्यांनी देशभर पोहोचविलेले निवडणूक चिन्ह वापरून निवडणुका लढविण्याची भाषा का करता? हिंमत असेल तर स्वतःचा पक्ष स्थापन करून स्वतंत्र निवडणूक चिन्हावर लढून दाखवा. मग, महाराष्ट्रातील जनता तुम्हाला काय दाखवायचे ते दाखवेल, असे आव्हान राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आमदारजितेंद्र आव्हाडयांनीअजित पवारयांना दिले.

आव्हाड म्हणाले की, निवडणूक आयोगात पात्र - अपात्रतेसंदर्भात लढाई सुरू आहे. त्यानुषंगानेच त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात, शरद पवार यांच्यावर हुकूमशहा असल्याचे आरोप केले. शरद पवार हे कुणाचे ऐकत नाहीत. ते सर्व निर्णय एकट्यानेच घेतात, असे आरोप केले आहेत.बापासाठी मरण आले तरी बेहत्तर

प अपात्रतेबाबत पत्रकारांनी विचारले असता, निर्णय काय येणार आहे, हे आम्हास माहीत आहे.

प पण, आम्हाला त्याची भीती नाही. ज्या बापाने आम्हाला घडविले. त्या बापापुढे आमदारकी काय महत्त्वाची? त्या बापासाठी मरण आले तरी बेहत्तर, असा निर्धारही आव्हाड यांनी व्यक्त केला.प आव्हाड म्हणाले, प्रतिज्ञापत्रावर पहिली सही सुनील तटकरे यांनी केली आहे. त्यांनाच शरद पवार यांनी दोन वेळा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केले होते, मंत्रिपदही दिले होते.

प त्यांच्या मुलीला आमदारकी आणि मंत्रिमंडळात मानाचे स्थान दिले होते. एवढं सगळं घेऊनही तटकरे हे शरद पवार यांना हुकूमशहा कसे काय म्हणू शकतात? राष्ट्रवादी कॉंग्रेस या पक्षाचे जन्मदाते शरद पवार हेच आहेत.

त्यांनीच पक्षाला निवडणूक चिन्ह मिळवून दिले आहे. आता हाच पक्ष आणि चिन्ह ताब्यात घेण्याचा प्रयत्न ते करीत आहेत.

# आदिवासी गोवारी जमातीचं नागपुरात तीव्र आंदोलन

**नागपूर :** गोंड गोवारी समाजाच्या विविध मागण्यांसाठी नागपुरात सोमवारी सुमारे ३० ते ३५ हजार समाज बांधव रस्तावर उतरले होते. आदिवासी गोंड- गोवारी समाजाच्या लोकांनी अख्खं नागपूरच वेठीस धरलं होतं. आंदोलनकर्ते आणि शासनाच्या प्रतिनिधींमध्ये रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली.

**नाही तर पुन्हा आमरण उपोषण करणार :** जिल्हाधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांना मुंबईमध्ये बैठकीचं आश्वासन दिलं आहे. आदिवासी गोंड गोवारी समाजाला एसटी प्रमाणपत्र देताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी, १० फेब्रुवारी रोजी मंत्रालयात शिष्टमंडळासोबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी बैठक निष्फळ झाल्यास १२ तारखेपासून पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिलाय. मात्र, याप्रसंगी आंदोलक आणि गोंड गोवारी समाजातील नागरिक यांच्यात आंदोलनावरून मतभेद दिसून आले.

**या आहेत मागण्या :** १४ ऑगस्ट २०१८ पुर्वी आणि त्यानंतर महाराष्ट्रातील गोंड- गोवारी जमातीला निर्गमित करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्रानुसार अनुसूचित जमातीचे सर्व लाभ देण्यात यावेत. तसेच वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. गोंड गोवारी जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्राच्या आधारे पदवी आणि इतर उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बेकायदेशीरपणे रोखून ठेवण्यात आलेल्या स्कॉलरशिप विनाविलंब देण्यात यावी. पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या रोखून ठेवलेले पदवी प्रमाणपत्रे तत्काळ निर्गमित करावे, यासह अनेक मागण्यांसाठी सोमवारी नागपूरच्या संविधान चौकात हजारोंच्या संख्येने आदिवासी गोवारी जमातीच्या लोकांनी आंदोलन केलं.

**१२ दिवसांपासून तीन समाजबांधव उपोषणावर :** ११४ हुतात्मा आदिवासींच्या सर्व आदिवासी गोंड गोवारी बांधवांना अभिवादन करून, २६ जानेवारीपासून समाजातील तिघे उपोषणाला बसले आहेत. गेल्या १२ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू आहे.

# पुणे रिंग रोडसाठी भूसंपादनाचं काम अंतिम टप्प्यात

## २ हजार ६३५ कोटींचा मोबदला वाटप

**पुणे :** पुण्यातील पश्चिम रिंग रोडच्या भूसंपादनासाठी २ हजार ६३५ कोटींचा मोबदला वाटप करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे रिंग रोडच्या भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात आलं आहे. पुणे जिल्ह्याच्या आणि राज्याच्या विकासासाठी अत्यंत म हत्वपूर्ण असणाऱ्या पुणे रिंग रोडच्या भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात आलं आहे

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या तसेच कोल्हापूर, सासवड, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, माणगाव, कोकण व मुंबई या भागातून येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या वाहनांना पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातून जावे लागते. त्यामुळे शहरांतर्गत वाहतूकीवर त्याचा ताण पडत आहे. बाहेरून येणारी वाहने शहराच्या आत न आणता बाहेरून योग्य त्या दिशेला वळविण्याकरीता शहराबाहेरून रिंग रोड बनवणे आवश्यक असल्याने शासनाने २०१५ मध्ये पुणे शहराभोवती रिंग रोड बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला होता.

या प्रकल्पाकरीता अंम लबजावणी यंत्रणा म्हणून शासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास म हामंडळाला नियुक्त केले आहे. हा प्रकल्प पूर्व व पश्चिम अशा दोन टप्प्यात विभागला आहे. प्रकल्पाची आखणी अंतिम झाल्यानंतर पूर्व व पश्चिम चक्राकार महामार्गासाठी भूसंपादनाच्या प्राथमिक अधिसूचना २०२१ मध्ये प्रसिद्ध झाल्या.

प्रकल्पासाठी आवश्यक मोजणीला स्थानिक नागरिकांचा विरोध होता. कोरोना संकटाचा कालावधी असतानाही जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी स्थानिक नागरिकांसोबत संवाद साधून त्यांना प्रकल्पाचे महत्व समजावून सांगितले. भूसंपादनामुळे होणारा आर्थिक लाभ भूधारकांना समजावून सांगण्यात यश आल्याने संयुक्त मोजणीचे काम अल्पावधीत पूर्ण करण्यात आले.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सहा तालुक्यातील सुमारे ८४ गावातून जमीन संपादन करणे हे मोठे आव्हान होते. त्यासाठी विविध प्रकारच्या बाधीत होणाऱ्या जमिनीसाठी दर निश्चिती करण्यात आली. नंतरच्या काळात मुल्यांकनासंदर्भात शासनाने २४ जानेवारी २०२३ रोजीच्या परिपत्रकाद्वारे दिलेल्या सुचनेनुसार निश्चित केलेले दर रद्द करून नव्याने दर निश्चिती करण्यात आली. असे करताना भूधारकांचे समाधान योग्यप्रकारे होईल याचीदेखील दक्षता घेण्यात आली.

नवीन दरानुसार मोबदला निश्चिती करून पहिल्या टप्प्यात पुणे (पश्चिम) चक्राकार मार्गाच्या एकूण ३२ गावांतील भूधारकांना संम तीचे विकल्प दाखल करण्यासाठी नोटीसा देण्यात आल्या. भूधारकांनी संमती दिल्यानंतर त्यांना २५ टक्के अतिरिक्त मोबदला प्राप्त होण्यासाठी सर्व भूसंपादन अधिकाऱ्यांच्या कार्यालयात स्वतंत्र भूसंपादन कक्ष कार्यान्वित करण्यात आले. पश्चिम चक्राकार मार्गातील मावळ, मुळशी, हवेली व भोर तालुक्यातील संपादित करावयाच्या सुमारे ६४५ हेक्टर जमिनीपैकी ३०७ हेक्टर क्षेत्र संमतीने घेण्यात आले. उर्वरीत क्षेत्राचे भूसंपादनाचे निवाडे जाहीर करण्यात येवून प्रकल्पाकरिता जम ीन हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

पूर्व रिंग रोड मार्गातील मावळ, खेड, हवेली, पुरंदर आमि भोर

# महिलांच्या सुरक्षेसाठी रेल्वेचा 'तिसरा डोळा'; कोचमध्ये २४ तास नजर

**मुंबई :** मुंबईच्या उपनगरीय रेल्वे गाड्यांसह एक्स्प्रेसमधून रात्री - अपरात्री प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर असतो. परंतु या महिला प्रवाशांचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी मध्य रेल्वे व्यापक प्रयत्न करत असून, मध्य रेल्वेवरील उपनगरीय ट्रेनच्या ४२१ महिला डब्यांमध्ये आणि मेल, एक्स्प्रेस ट्रेनच्या १७६२ डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे २४ तास नजर ठेवली जात आहे.

रेल्वे प्रवाशांच्या सुविधा वाढवणे आणि रेल्वे स्थानकांना आधुनिक करण्याच्या हेतूने १८ स्थानके निवडण्यात आली आहेत. त्यापैकी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, नागपूर आणि अजनी स्थानकांवरील कामे वेगात सुरू आहेत. पुढील दोन वर्षांत ती पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या व्यतिरिक्त पंतप्रधानांनी सुरू केलेल्या अमृत भारत योजनेच्या अंतर्गत उत्तम प्रवासी सुविधा देण्यासाठी ७६ स्थानके अमृत स्टेशन म्हणून निवडली आहेत आणि या सर्व स्थानकांवर पुनर्विकासाचे काम सुरू आहे. नुकतीच मुंबई ते जालना वंदे भारत ट्रेन सुरू झाली असून, इंदूर - भोपाळ ट्रेनचा विस्तार नागपूरपर्यंत केला आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा दाखवण्यासाठी आणि पर्यटन क्षेत्रात नवीन सेवा आणण्यासाठी, आईआरसीटीसीद्वारे मध्य रेल्वेच्या समन्वयाने २१ भारत गौरव गाड्या चालवल्या जात आहेत, असेही राम करण यादव यांनी सांगितले.



**उपनगरीय गाड्यांच्या ५१२ महिला डब्यांमध्ये इमर्जन्सी टॉक बॅक सिस्टीम देण्यात आली असून, मध्य रेल्वेवरून विशेषत: रात्री जाणाऱ्या १०९ मेल/एक्स्प्रेस गाड्या आरपीएफद्वारे एस्कॉर्ट केल्या जात आहेत. एक्स्प्रेसमध्ये अशी सुरक्षा बाळगली जात आहे. यामुळे गुन्हेगारीच्या घटना कमी करण्यात यश आले आहे.**

**- राम करण यादव, महाव्यवस्थापक,**

**मध्य रेल्वे सेवांचा विस्तार**

प मध्य रेल्वे १८१० सेवांसह मुंबईतील सर्वात व्यस्त उपनगरीय प्रणालींपैकी एक चालवते. ज्यात ६६ वातानुकूलित सेवांचा समावेश आहे. आता खारकोपर-उरण विभागात उपनगरीय सेवांचा विस्तार करण्यात आला असून, ठाणे

## रविवारी साताऱ्यात रंगणार जाणता राजा महानाट्य गौरव सोहळा

**सातारा :** सातारा, फलटण, कराड, वाई, महाबळेवर या तालुक्यांच्या ठिकाणी सांस्कृतीक कार्यविभाग, सांसकृतीक संचालनालय व सातारा जिल्हा प्रशासन यांच्यावतीने राजधानी महा संसकृतीचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. राजधानी महा संस्कृती महोत्सवाला पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. हे कार्यक्रमांना प्रवेश विनामूल्य त्याचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील विविध संसकृतींचे अदानप्रदान, स्थानिक कलाकरांसाठी व्यासपीठ, लुप्त होत चालेल्या संस्कृतीचे जतन व संवर्धन तसेच स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञात, अज्ञात लढवयांची माहिति जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महा संस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. सातारा जिल्ह्यातही पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राजधानी महा संस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार ८ फेब्रुवारी रोजी सातारा येथे सायं. ६ वाजता श्रीमंत छत्रपती शाहू कला मंदिर येथे कलर्स ऑफ इंडिया कार्यक्रम व ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गांधी मैदान ते शिवतीर्थ शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आल आहे. ८ ते १० फेब्रुवारी या कालावधीत सत्यवती जोशी सभागृह, कन्या शाळा, वाई येथे शिवकालीन शस्त्र प्रदर्शन व श्रीमंत छत्रपती शाहू कलामंदिर येथे बचत गट प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार ८ फेब्रुवारी रोजी फलटण येथे महाराजा मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता शिवव्याख्यान व विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, तसेच याच दिवशी कराड येथील टाऊन हॉल येथे सायंकाळी ५ वाजता जागर लोककेलचा कार्यक्रमाबरोबर विद्यार्थ्यांचे ऐतिहासिक प्रवेश सादरीकरण कार्यक्रम होणार आहेत.

# धनगर आरक्षण आंदोलन तीव्र करण्याचा राज्यव्यापी मेळाव्यात निर्धार

**बिदाल :** धनगर समाजास एसटीचे आरक्षण आहे. पण धनगर या शब्दाचा धनगड असा उल्लेख केला गेल्याने त्यांच्या हक्काचे आरक्षण मिळू शकत नाही. आगामी काळात सर्व आमदार, खासदारांनी लक्ष घालून धनगड या शब्दाऐवजी धनगर हा शब्द दुरुस्त करून एसटी प्रवर्गातून सवलत मिळावी. यासाठी केंद्र व राज्य सरकारने राष्ट्रपतींकडे दुरुस्तीसाठी शिफारस करावी.

अन्यथा राज्यातील सर्व धनगर बांधवांनी एकत्रितपणे लढा उभारुन रास्तारोको करत मुंबईत आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार राज्यव्यापी धनगर समाजाच्या मेळाव्यात करण्यात आला. धनगर समाजास एसटीच्या सर्व सवलती सरकारने द्याव्यात, या मागणीसाठी सातारा जिल्ह्यातील म्हसवड पालिका कार्यालय समोर दि. २६ जानेवारीपासून ऊत्तम विरकर, जयप्रकाश हुलवाल व गणेश केसकर या तीन तरुणांनी आमोरण उपोषण सुरु केले आहे.

अन्यथा राज्यातील सर्व धनगर बांधवांनी एकत्रितपणे लढा उभारुन रास्तारोको करत मुंबईत आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार राज्यव्यापी धनगर समाजाच्या मेळाव्यात करण्यात आला. धनगर समाजास एसटीच्या सर्व सवलती सरकारने द्याव्यात, या मागणीसाठी सातारा जिल्ह्यातील म्हसवड पालिका कार्यालय समोर दि. २६ जानेवारीपासून ऊत्तम विरकर, जयप्रकाश हुलवाल व गणेश केसकर या तीन तरुणांनी आमोरण उपोषण सुरु केले आहे.

ते अखंडीतपणे सुरु असून उपोषणकर्त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यातील धनगर समाज बांधवानी आज राज्यव्यापी मेळाव्याचे आयोजन केले होते. त्यास माण, खटाव, फलटण, खंडाळा, माळशिरस, सांगोला, औसा, लातूर, पंढरपूर, कवठेमहांकाळ, आटपाडी, जत, कोल्हापूर तालुक्यातून मोठ्या संख्येने धनगर समाज बांधव उपस्थित होते.

या आंदोलनास विभागातील धनगर समाजासह इतर जाती - जमातींचा पाठिंबा मिळत आहे. याठिकाणी दिवस - रात्र गजी पथके नृत्याचा फेक धरत आहेत. रात्री पारंपारिक धनगरी ओव्या गायनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यातून धनगर समाज आपले प्रश्न पोटतिडकीने मांडू लागले आहेत. तसेच सणगर व मुस्लिम समाजानेही या आंदोलनास पाठिंबा दिला आहे.

मेळाव्यात आंदोलकांसह महिलांनीही डोक्यावर पिवळ्या टोप्या, फेटा परिधान करत पिवळ्या भंडाऱ्याची उधळण केली. यावेळी येळकोट येळकोट... जय मल्हार... च्या घोषणांनी धनगर समाज बांधवांनी हा मेळावा दणाणून सोडला.




**म्हसवड येथे धनगर आरक्षण आंदोलन तीव्र करण्याचा मेळाव्यात निर्धार. (छायाचित्र आकाश दडस)**

# गौण खनिजाची चोरी प्रकरणी कारवाई करण्याची मागणी



**बाणेर,बालेवाडी :** बाणेर येथे गौण खनिजाची चोरी होत असतांना तक्रार दाखल करूनही दखल तहसिलदार कार्यालया कडून घेतल्या गेली नाही खनिजाची चोरी होते याची पोलीसांनी तक्रार दाखल करण्याचे आदेश देऊनही तहसिल कार्यालयाचे उदासिन धोरण दिसत आहे', तहसिल कार्यालय बघ्याची भूमीका घेत आहे

बाणेर येथिल सर्वे नंबर ७३ तेज इलेव्हिया प्रोजेक्ट साठी खोदकाम करण्यात येत आहे यांना १२२५ ब्रास खोदाईची परवानगी दिली होती प्रत्यक्षात २४४२ ब्रास इतकी खोदाई करण्यात आली या बाबत सदर तक्रार तूकाराम कळमकर केल्या नंतर मंडल अधिकारी यांच्या कडून१/२/२०२३ रोजी पंचनामा केला गेला परंतू आज पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही वेळोवेळी तक्रार करूनही दखल या कामाबाबत घेण्यात आली नाही यानंतर कळमकर यांनी जिल्हाधिकारी खनिजकर्म अधिकारी यांना देखील कारवाई संदर्भात पत्रव्यवहार केला यानंतर चतुर्श्रृगी पोलीसांनी आदेशात गौण खनिजाची चोरी संदर्भात तहसिलदार यांच्या कडे दि १८/८/२०२३ रोजी तक्रार करून कळविले यात पुष्कळ दिवस होऊनही तहसिलदार यांच्या कडून तक्रार दाखल करण्यात आली नाही आणि दंडात्मक कारवाई केली नाही सदर प्रकरणात आर्थिक भ्रष्टाचार झाला असल्याचे देखील तूकाराम कळमकर यांनी म्हटले आहे याची तक्रार मुख्यमंत्री कार्यालया कडे करून तक्रारीची दखल घेण्याची मागणी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तहसिलदार कार्यालयाच्या उदासिन धोरणामुळे या विभागात खोदकामाची कमी मागणी करून जास्तीचे खोदकाम करून दिवसा ढवळ्या गौण खनिजाची लूट होत आहे यात फार मोठे धोगेदोरे गूंतलेले असल्याचे बोलल्या जाते गौण खनिजाची बाणेर मध्ये चोरी केल्या जात असून शासनाचा कोट्यावधी रूपयाचा महसूल देखील बुडवल्या जात आहे या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी येथिल जनते कडून होत आहे

# महेश गायकवाड यांच्या प्रकृतीत सुधारणा

**मुंबई :** भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात हे दोघे जखमी झाले आहेत.

त्यामध्ये गायकवाड यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटर ठेवले होते. त्यातच आता, महेश गायकवाड यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असून त्यांना लावण्यात आलेले व्हेंटिलेटर देखील काढण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे.

विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यातच भाजपा आमदार गणपत गायकवाड यांनी २ फेब्रुवारी रोजी महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात महेश गायकवाड यांच्यासह राहुल पाटील असे दोघे जखमी झाले होते.

जखमी गायकवाड आणि पाटील यांना कल्याण येथून थेट रात्री ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात उपचारार्थ हलवले करण्यात आले. तसेच रुग्णालयात आणल्यावर डॉक्टरांनी तातडीने



त्या दोघांवर शस्त्रक्रिया करून लागलेल्या गोळ्या काढल्या. यामध्ये गायकवाड यांनी प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते.

पाटील यांची प्रकृती स्थिर असून त्यांनाही अतिदक्षता विभागात ठेवले होते. तसेच खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे महेश गायकवाड यांच्यासोबत संवाद साधणारा एक फोटो सोमवारी सकाळी व्हायरल झाला होता. त्यातच आता महेश गायकवाड यांना लावलेला व्हेंटिलेटर काढण्यात आल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे

## केंद्र सरकारची निर्यातबंदी अन शेतकऱ्यांचे हाल!

**सोलापूर :** केंद्र सरकारच्या निर्यातबंदी निर्णयानंतर कांद्याचा दर दिवसेंदिवस कमी होत आहेत. निर्यातबंदीपूर्वी साडेचार हजारांवर पोचलेला कांद्याचा भाव सध्या प्रतिक्विंटल नऊशे ते अकराशे रुपयांपर्यंत खाली आला आहे. सोलापूर बाजार समितीत आवक घटली असूनही सरासरी भाव मात्र प्रतिकिलो नऊ ते १२ रुपयांपर्यंतच आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत चांगला भाव मिळतो म्हणून बीड, धाराशिव, लातूर, कर्नाटक, पुणे, कोल्हापूर या जिल्ह्यातून याठिकाणी कांदा विक्रीसाठी येत होता. पण, मागील १५ ते २० दिवसांपासून भाव कमी झाल्याने आवक देखील घटली आहे. २७ जानेवारीपासून सोलापूर बाजार समितीत पाचशे गाड्यांपेक्षाही कमीच कांद्याची आवक आली आहे. मात्र, दर काहीच वाढले नाहीत. शेतकऱ्यांच्या हाती उत्पन्नाचा खर्च देखील पडत नाही अशी वस्तुस्थिती आहे.

कांद्यातून चार पैसे मिळतील आणि त्यातून डोक्यावरील बँक, खासगी सावकारांचे कर्ज कमी होईल अशी आशा होती. पण, निर्यातबंदीच्या एका निर्णयामुळे शेतकऱ्यांना खताचे, रोपाचे पैसे देखील द्यायला हातात काही राहिले नाही. आलेले कांद्याचे बिल रोजगार, बारदाना, वाहन भाड्यापोटीच खर्च झाले अशी व्यथा शेतकऱ्यांची आहे. एवढी चिंताजनक वस्तुस्थिती असतानाही केंद्र सरकार अजूनही निर्यातबंदीवर ठाम आहे. दुसरीकडे राज्य सरकारकडून देखील अनुदान देण्यासंदर्भात काहीच बोलले जात नाही.

# 'पक्षाचा बाप आमच्यासोबत....', लढू आणि जिंकू



## रोहित पवारांनी व्यक्त केला विश्वास

**मुंबई :** अजित पवारांचा गट हाच खरा राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचा निर्णय आज निवडणूक आयोगाने दिला आहे. आगामी राज्यसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला नवीन नाव आणि चिन्ह देण्यासाठी विशेष सवलत प्रदान केली आहे. शरद पवार गटाने ७ फेब्रुवारी दुपारी ३ वाजेपर्यंत तीन नावे सादर करण्यास सांगितले आहे. दरम्यान रोहित पवार यांनी 'आज सत्तेचा गैरवापर करुन पक्ष आणि चिन्ह जरी बळकावलं असलं तरी पक्षाचा बाप आमच्यासोबत आहे!', असं म्हणत लढू आणि जिंकू असा विश्वास व्यक्त केला आहे.

रोहित पवार यांनी सोशल मिडीया एक्सवर पोस्ट करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. आपल्या पोस्टमध्ये लिहले आहे की, केंद्रातील महाशक्तीच्या बेलगाम सत्तेचा गैरवापर करुन फुटीर गट व्यक्तीगत स्वार्थासाठी पक्ष बळकावण्याचा असंवैधानिक निर्णय घेऊ शकतो. परंतु आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर वाढवणं, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणं, मंबईचं महत्त्व अबाधित राखण्यासाठी प्रयत्न करणं, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणं, राज्यातील हक्काचे प्रकल्प राज्यातच टिकवून ठेवणं असे महाराष्ट्राच्या हिताचे कायदेशीर निर्णय केंद्रातील महाशक्तीचा वापर करुन सामान्य लोकांच्या हितासाठी मात्र त्यांना घेता येत नाहीत, यातच त्यांची लायकी कळते.आज सत्तेचा गैरवापर करुन पक्ष आणि चिन्ह जरी बळकावलं असलं तरी पक्षाचा बाप आमच्यासोबत आहे.

### अजित पवार यांची प्रतिक्रिया

आमच्या वकिलांनी मांडलेली बाजू ऐकून घेऊन निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय आम्ही विनम्रपणे स्वीकारत आहोत!, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. अजित पवार यांनी एक्सवर पोस्ट करून ही प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, अजित पवार यांनी एक्सवर पोस्टमध्ये स्वत:ला राष्ट्रवादीचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जाहीर केलं आहे.

### अजित पवार गटाचे प्रवक्ते सुनिल तटकरे यांची प्रतिक्रिया

केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयावर आम्ही अतिशय आनंदी आहोत. आयोगाने अत्यंत योग्य वेळी निर्णय देऊन भारतीय लोकशाही सिद्धांतावर शिक्कामोर्तब केले याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी माध्यमांसमोर समाधान व्यक्त केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली एनडीएमध्ये सहभागी होताना, राज्यात महायुती सरकारमध्ये सहभागी होताना अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्यात आपली भूमिका योग्यरीत्या बजावेल. महाराष्ट्रातील जनतेचा याला मोठा पाठिंबा मिळेल, असा विश्वासही सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

# थकबाकीमुळे वीज खंडित करण्याची मोहीम वेगात

## ५० हजारांवर थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित

## पश्चिम महाराष्ट्रात १८ लाख थकबाकीदारांकडे ३३२ कोटींची थकबाकी

**पुणे :** वारंवार आवाहन करूनही वीजबिलांचा भरणा न केल्यामुळे महावितरणची आर्थिक स्थिती गंभीर होत आहे. सद्यस्थितीत पश्चिम महाराष्ट्रात घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वर्गवारीतील १७ लाख ८५ हजार वीजग्राहकांकडे ३३२ कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी झाली आहे. त्यामुळे थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या मोहिमेला वेग देण्यात आला असून ५० हजार १३६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

पुणे प्रादेशिक विभागामध्ये सर्वाधिक घरगुती १५ लाख ८६ हजार ग्राहकांकडे २२१ कोटी ६३ लाख रूपये तसेच वाणिज्यिक १ लाख ६५ हजार ग्राहकांकडे ६७ कोटी ४० लाख रूपये तर औद्योगिक ३३ हजार ग्राहकांकडे ४३ कोटी ७६ लाख रुपयांची थकबाकी आहे. वाढत्या थकबाकीमुळे वसूली मोहिमेला वेग देण्यात आला आहे. थकबाकीदारांचा केवळ वीजपुरवठा खंडित करणे हा महावितरणचा उद्देश नाही. परंतु वारंवार आवाहन किंवा विनंती करूनही जे थकबाकीदार थकीत वीजबिलांची रक्कम भरण्यास दाद देत नाहीत त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे वीजग्राहकांनी चालू व थकीत बिलांचा त्वरीत भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन पुणे प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे यांनी केले आहे.

घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडे मंगळवार (दि. ६) पर्यंत (कंसात ग्राहक) पुणे जिल्हा- २०९ कोटी ३६ लाख रुपये (८,५८,३१०), सातारा- २१ कोटी २१ लाख (१,९३,५६०), सोलापूर- ४६ कोटी ४१ लाख (२,५७,७९६), कोल्हापूर- ३१ कोटी ७० लाख (२,५९,१८६) आणि सांगली जिल्ह्यात २४ कोटी १० लाख रुपयांची (२,१६,०९६) थकबाकी आहे. या थकबाकीमुळे गेल्या ३५ दिवसांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वर्गवारीतील ५० हजार १३६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये पुणे जिल्हा- २८ हजार ५५८, सातारा- ५,३६५, सोलापूर- ५,५९८, कोल्हापूर- ४,७४१ आणि सांगली जिल्ह्यातील ५,८७४ थकबाकीदारांचा समावेश आहे.

आर्थिक अडचणीत असलेल्या महावितरणकडून थकीत रक्कम किती आहे हे न पाहता नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरु आहे. सोबतच थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची स्वतंत्र पथकांद्वारे पडताळणी सुरु आहे. शेजाऱ्यांकडून किंवा इतर ठिकाणाहून थकबाकीदार विजेचा वापर करीत असल्याचे आढळल्यास शेजारी व संबंधित थकबाकीदारांविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५/१३८ नुसार कारवाई करण्यात येत आहे.

वीजग्राहकांना केव्हाही व कुठूनही ऑनलाइनद्वारे थकीत व चालू वीजबिल भरण्याची सोय ु. ारहरवळीले.ळप या वेबसाईटवर तसेच महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे उपलब्ध आहे. सोबतच ५ हजार रुपयांपेक्षा अधिक बिल असणाऱ्या सर्व लघुदाब ग्राहकांना आरटीजीएस किंवा एनईएफटीद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे.

# मंगळवेढ्यात पुन्हा पेटला पाणी प्रश्न आग विझवणारे पाणी, राजकारण

**सलगर बुद्रुक :** आगामी २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीची चाहूल लागायला सुरवात झाली आहे. निवडणुकीचा कालावधी जसजसा जवळ येत चाललाय तसतशे आग विझवणारे पाण्यामुळे मंगळवेढयात राजकारण पेटत चालले आहे. काही गावांनी निवडणुकीवर बहिष्कार घालण्याची तयारी सुरू केली आहे.

तर काही गावातील ग्रामस्थ आमची गावे कर्नाटकाला जोडा अशी मागणी करत आहेत. पाणी प्रश्नावरून विरोधकांनी विद्यमान लोकप्रतिनिधींना घेरण्याची तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे विद्यमान लोकप्रतिनिधिंनीही आगामी निवडणुकीच्या आत पाणी प्रश्नावर ठोस भूमिका घेतली जाईल अशी भीष्मप्रतिज्ञा केली आहे.

दरम्यान २००९ च्या लोकसभेच्या निवडणुकीवर तालुक्यातील ३५ गावांनी बहिष्कार घातला होता. नंतर



निवडणुकीचा निकाल तत्कालीन खासदार सुशीलकुमार शिंदेच्या बाजूने लागला. त्यानंतर त्यांनी भाषणात ३५ गावच्या बहिष्काराची चेष्टा केली होती. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत पाणी प्रश्नावरून भालकेंनी मैदान मारले. सलग तीन वेळा आमदार होऊन सुद्धा व प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या दंडात पाणी आले नाही.

त्यानंतर पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या ३५ गावांची संख्या २४ गावांवर आली. २०१९ ला भालकेंच्या निधनानंतर मतदारांनी भावनिक साद न ऐकता आवताडेंच्या गळ्यात विजयी माळ टाकली. त्यानंतर पाणी जवळ आलंय म्हणणारी मंडळी विरोधात गेली अन पाणी कुठाय म्हणायला लागली. हेच या पाण्याचे भीषण वास्तव आहे.

### राजकारणी तुपाशी अन जनता उपाशी -

पाणी प्रश्नाचे राजकीय भांडवल करून राजकारण्यांनी सरपंच, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, कारखान्याचे संचालक, मार्केट कमीट्या, खरेदी विक्री संघ, सोसायट्या, जिल्हा नियोजन सदस्य आदी विविध पदांवर सत्ता उपभोगली. पण कधीही न भरणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या झोळीत मताचे दान टाकणाऱ्या शेतकऱ्यावर अजूनही शेतात उभा राहून मृगजळाला पाणी समजण्याची वेळ आली आहे. याला सर्वपक्षीय नेते जबाबदार आहेत.खरं तर राजकीय इच्छा शक्ती अभावी मंगळवेढ्यातील शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही हे वास्तव कुणी नाकारू शकत नाही.

दरम्यान, विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्याकडे फक्त अडीच वर्षाच्या आमदारकीच्या कामाचा अनुभव आहे. या थोडक्या कालावधीतच उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मुख्यमंत्र्यांनी मंजुरीची सही केली आहे. त्यानंतर ही फाईल मंत्रिमंडळा समोर जाऊन निधी मंजूर होणार आहे. सदरच्या उपसा सिंचन योजनेला आगामी निवडणुकीपूर्वी प्रयत्नाअंती मार्गी लावू, असे मत आवाताडे यांनी व्यक्त केला आहे.

# विरोधी पक्षनेते अंबादास दानवे जिल्हा दौऱ्यावर

## नागरिकांनी प्रश्न घेऊन संपर्क साधावा : माजी आमदार उल्हास पाटील

**शिरोळ :** प्रतिनिधी शिवसेना श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते व महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे हे गुरुवार दिनांक ८ फेब्रुवारी२०२४ रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना या दिवशी आपले सर्व प्रश्न लेखी स्वरूपात घेऊन संपर्क साधावा असे आवाहन शिरोळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार उल्हास पाटील यांनी केले



विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या होणाऱ्या कोल्हापूर जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शिरोळ येथील माजी आमदार उल्हास पाटील जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक झाली या बैठकीत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे गुरुवारी सकाळी१० ते १ या वेळेत कोल्हापूर येथील शासकीय विश्रामगृहातील शाहू सभागृहात जनता दरबार घेणार आहेत,तरी नागरिकांनी आपले शासकीय प्रलंबित प्रश्न लेखी स्वरूपात घेऊन विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्यापुढे मांडावेत प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील तरी नागरिकांनी वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन माजी आमदार उल्हास पाटील यांनी केले

उद्धव ठाकरे गट शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख हाजिअस्लम सय्यद ,राज्य संघटक चंगेजखान पठाण , शिवसेना कोल्हापूर जिल्हा प्रमुख वैभव उगळे, महिला जिल्हा संघटिका मंगलताई चव्हाण, उपजिल्हाप्रमुख मधुकर पाटील,युवासेना उपजिल्हाधिकारी प्रतीक धनवडे,महिला उपजिल्हा संघटिका वैशालीताई जुगळे,तालुका संघटिका साजिदा घोरी,युवासेना तालुका प्रमुख निलेश कुरुंदवाड शहर प्रमुख बाबासाहेब सावगावे यांच्यासह उपतालुका प्रमुख विभाग प्रमुख शहर प्रमुख शिवसेना युवासेना महिला आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याचे काम लवकरात लवकर होऊन ते पूर्ण व्हावे : रावसाहेब देसाई

**शिरोळ :** शिरोळ शहरात उभारण्यात येत असलेल्या भव्य छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा व स्मारक समितीची घोषणा छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा समितीचे अध्यक्ष रावसाहेब देसाई यांनी पत्रकार परिषदेत घोषित केली ३१ जणांचा समावेश असलेली समिती वेगवेगळ्या स्तरावर काम करणार आहे शिवाय पुतळ्याचे काम लवकरात लवकर होऊन ते पूर्ण व्हावे याकरता विविध विषयाच्या निवड समिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिवाय सर्व समाजातील घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगून पुतळा समितीमध्ये ज्याना काम करावयाचे आहे व आमच्याकडून नजरचुकीने नाव राहिले असेल तर त्या युवकांनी पुतळा समितीची संपर्क साधून या कार्यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी शेवटी केले.



**शिरोळ येथील अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व स्मारक समितीची घोषणा करताना अध्यक्ष रावसाहेब देसाई.**

या पत्रकार परिषदेला माजी सरपंच गजाननराव संकपाळ दरगु गावडे राहुल यादव धनाजी चुडमुंगे संजय शिंदे विजय आरगे बाळासो कोळी (दिवाण) दिगंबर सकट बापूसाहेब गंगधर आदी मान्यवर व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समिती पदाधिकारी व सदस्य पुढील प्रमाणे उपाध्यक्ष - पृथ्वीराजसिंह यादव खजिनदार - धनाजी चुडमुंगे सचिव - पांडुरंग उर्फ अविनाश माने सदस्य - माजी खासदार राजू शेट्टी माजी आमदार उल्हास पाटील माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील दत्त कारखान्याचे संचालक अनिलराव यादव दलितमित्र डॉ अशोकराव माने दत्तचे संचालक दरगू गावडे माजी उपसरपंच प्रताप उर्फ बाबा पाटील अजिंक्यतारा मंडळाचे अध्यक्ष धनाजी पाटील - नरदेकर माजी नगरसेवक प्रकाश गावडे पंडित काळे शरद उर्फ बापू मोरे माजी सरपंच गजानन संकपाळ प्रमोद उर्फ बाळासो लडगे विजय वसंतराव आरगे बी जी माने रणजीतसिंह दिलीपराव पाटील सचिन शिंदे मुकुंद उर्फ बाळासो गावडे बाळासो कांबळे प्रवीण चुडमुंगे रणजीत जयवंतराव जगदाळे धनाजी शिवाजीराव जाधव शक्तीजीत गुरव रावसाहेब माने सहसचिव - अमर माने शुभम धनाजी माने पिंटू उर्फ काशीम बाळासाहेब शेख यांचा समावेश करण्यात आला आहे

छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी विविध समित्या निवडण्यात येणार आहेत या समितीमध्ये प्रत्येक समाजातील व्यक्तीची निवड करून कामकाज केले जाणार आहे त्याही समित्या लवकरच जाहीर करण्यात येणार आहे असे समितीचे अध्यक्ष रावसाहेब देसाई यांनी सांगितले



# कोल्हापुरातील अंबाबाईच्या मूर्ती संवर्धनाबाबत पुरातत्व खातेच गप्पगार

## न्यायालयात म्हणणे मांडण्याची प्रतीक्षा

**कोल्हापूर:** करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या मूर्तीबाबत खुद्द पुरातत्व खात्यालाच गांभीर्य नसल्याचा अनुभव गेल्या वर्षभरात आला आहे. मूर्तीच्या स्थितीची तज्ज्ञ अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करण्यात यावी, मूर्ती संवर्धनासाठी पावले उचलावीत या याचिकेवर खात्याने न्यायालयात वर्षभरात एकदाही आपले म्हणणे सादर केले नाही. अखेर न्यायालयाने खात्याचे म्हणणेच विचारात न घेता १२ तारखेला हे प्रकरण आदेशावर ठेवले आहे.करवीर निवासिनी श्रीअंबाबाईची मूर्ती आता नाजूक अवस्थेत असून, चेहऱ्यावरील लेपही आता उतरू लागला आहे. मूर्तीचे भाव बदलले आहेत. मूर्तीची ही अवस्था लक्षात घेता पुरातत्व खात्याने स्वत:हून मूर्तीचे तातडीने संवर्धन करावे किंवा आम्हाला संवर्धन करून घेण्यासाठी परवानगी द्यावी तसेच पुरातत्व खात्याच्या तज्ज्ञांकडून मूर्तीची पाहणी करण्यात यावी अशा मागणीचा दावा गजानन विश्वनाथ मुनिश्वर यांनीकोल्हापूरयेथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्याकडे दि. २१ मार्च २०२३ साली दाखल केला. या दाव्यात पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती, जिल्हा प्रशासन व राज्य पुरातत्व विभाग केंद्रीय पुरातत्व विभाग यांना प्रतिवादी करण्यात आले. तर ड. प्रसन्न मालेकर व सामाजिक कार्यकर्ते दिलीप देसाई हे प्रतिवादी म्हणून हजर झाले आहेत.

या प्रकरणात जिल्हा प्रशासन व देवस्थान समितीने आपले म्हणणे सादर केले आहे. मात्र आज अखेर पुरातत्व खात्याने म्हणणे न दिल्याने प्रकरण गेले वर्षभर प्रलंबित आहे अखेर दि. ३ फेब्रुवारीला झालेल्या सुनावणीत पुरातत्व खात्याचे म्हणणे लक्षात न घेता या अर्जाचा निर्णय करण्यासाठी दि. १२ फेब्रुवारी ही पुढील तारीख न्यायालयाने दिली.हीच माणसं कशाला ?रासायनिक संवर्धनावेळी अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक मूर्तीवरील नागासह अनेक चिन्हे गायब करून देवीचे स्वरूप बदलण्याचा अक्षम्य प्रकार केला. आताही दोन निवृत्त अधिकाऱ्यांची नावे सुचविण्यात आली आहेत, यावर देवस्थान समितीने आक्षेप घेतला असून, हीच माणसे कशाला हवी आहेत असा प्रश्न उपस्थित करत पुरातत्व खात्याकडे सध्या कार्यरत असलेले तज्ज्ञदेखील हे काम करू शकतात असे म्हणणे मांडले आहे. पण यामध्ये पुरातत्व खातेच बोलायला तयार नाही.अधिकारी फिरकलेच नाही

पुरातत्व खात्याच्या अधिकाऱ्यांनी २०१५ साली चुकीच्या पद्धतीने मूर्तीचे संवर्धन केले. सहा महिन्यांत मूर्तीवर पांढरा बुरशीजन्य थर दिसू लागला. २०२२ साली नवरात्रौत्सवाच्या आधी दोन दिवस मूर्तीच्या चेहरा व कानाजवळील लेप गळून पडल्याने गोपनीय पद्धतीने संवर्धन केले गेले. त्यावेळी पुरातत्व खाते मूर्तीची पाहणी करून निर्णय घेतील, असे तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी सांगितले होते. त्यानंतर पुरातत्वचे अधिकारी मंदिरात फिरकलेले नाहीत.राज्य संरक्षित स्मारकची अधिसूचनाही लटक्ली

अंबाबाईचे एवढे पुरातन मंदिर अजूनही राज्य संरक्षिक स्मारकांच्या यादीत नाही याला पुरातत्व खात्याची दप्तर दिरंगाईच कारणीभूत आहे. खात्याने २०१६ साली अधिसूचना काढून त्यावर हरकती मागविल्या होत्या. त्यावर गजानन मुनिश्वर यांनी घेतलेल्या एका हरकतीचे निराकरण करून मंदिर राज्य संरक्षित स्मारक घोषित करणे पुरातत्वला जमलेले नाही.

# सत्यशोधक समितीला राष्ट्रवादी सांस्कृतिक विभागाचा विरोध

## समितीमध्ये नाट्यक्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्याची मागणी : श्रीकिशन काळे

**पुणे :** सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्रमध्ये झालेल्या 'जब वी मेट' या नाटकामधील गोंधळाप्रकरणी जी सत्यशोधक समिती स्थापन केली आहे, त्या समितीला राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या वतीने विरोध करीत आहे. कारण या कमिटी मध्ये जे जे सदस्य म्हणून घेतले आहेत, ते एका ठराविक विचार धारेचे आहेत, असा आरोप राष्ट्रवादीच्या सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी केला आहे.



पाटील म्हणाले, स्थापन केलेली समिती पाहिल्यानंतर लागणारा निकाल हा फक्त एका बाजूने लागू शकतो, किंवा एकच बाजू समोर येऊ शकते असं आमचं स्पष्ट मत आहे. त्यामुळे तत्काळ या समितीमध्ये सुप्रसिद्ध लेखक दिग्दर्शक नागराज मंजुळे, लेखक दिग्दर्शक अतुल पेठे, लेखक दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले, राजन गवस, रंगनाथ पठारे यांच्यापैकी कोणत्याही दोन व्यक्तींचा समावेश किंवा तिघांचा समावेश यामध्ये करावा, अशी आम्ही राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या वतीने मागणी करीत आहोत.

कारण हल्ला करणारे हे निराळे राहिले आणि ज्यांना मारहाण झाली त्यांच्यांवरच गुन्हे दाखल झाले. आता विद्यापीठाने जी समिती चौकशी करणार आहे, त्यात देखील एकाच विचारधारेशी जोडलेले लोकं आहेत. त्यांनी एकतर्फी निर्णय घेऊ शकतील, म्हणून या समितीमध्ये नाटक्षेत्रातील योग्य व्यक्तींना समाविष्ट करावे, अशी आमची मागणी आहे.

# सातारा जिल्हा परिषद सी. ओ. श्रीमती यशीन नागराजन यांचे पत्रकारांनी केले स्वागत

**सातारा :** संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शैक्षणिक क्रांती घडवून महिला वर्गाला चूल आणि मूल या संकल्पनेतून बाहेर काढून विज्ञानवादी बनवणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा फुले व शिक्षण माता सावित्रीबाई फुले यांच्या कर्म व जन्मभूमीत श्रीमती यशीन नागराजन यांची निवड झाली आहे. सातारा जिल्हा परिषद सी. ओ .या पदावर पहिल्या महिला अधिकारी म्हणून इतिहासात नोंद झाली आहे. त्यांच्या आगमनाने महिला कर्मचारी वर्गांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.



सातारा जिल्हा परिषदेच्या (मुख्य कार्यकारी अधिकारी) सी.ओ .दालन मध्ये ज्येष्ठ पत्रकार अजित जगताप व धाडसी आणि निर्भीड पत्रकार विशाल कदम यांनी त्यांची भेट घेऊन त्यांचे मनापासून स्वागत केले. सातारा जिल्हा परिषदेच्या इतिहासामध्ये महिला सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून कर्तबगार महिलांनी राजकीय पक्षाने संधी दिली म्हणून ते पद भूषवले होते. पण शिक्षणाच्या जोरावर २०१९ साली आय. ए. एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन श्रीमती नागराजन यांनी विदेशी मंत्रालय सहाय्यक सचिव, यवतमाळ जिल्हाधिकारी अशा पदावर काम करून दलित, पद- दलित, आदिवासी व गरीब जनतेला शासकीय पातळीवर न्याय मिळावा. यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. आज औपचारिकता म्हणून त्यांच्या वतीने काही अधिकारी वर्गाने पत्रकार परिषद आयोजित केली होती.

## अल्पसंख्यांकासाठी काम करणाऱ्या संस्थांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**सातारा :** अल्पसंख्यांकाच्या कल्याणाकरिता पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक समितीची रचना करण्यात आलेली आहे. समितीमध्ये ग्रामीण तसेच नागरी क्षत्रातील अल्पसंख्यांक कल्याणाशी संबंधित कार्य करणाऱ्या तीन नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधीपैकी (प्रत्येकी १) प्रतिनिधीच्या नावाचा प्रस्ताव दि. २० फेब्रुवारी २०२४ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील फौजदारी शाखेत जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील फौजदारी शाखेशी संपर्क साधावा.

# ईडी, सीबीआयच्या नावानं विरोधकांना धमकावलं जातं



## प्रियांका चतुर्वेदी यांचा घणाघात

**नवी दिल्ली** - सध्या देशात ईडी, सीबीआयच्या नावानं विरोधकांना धमकावलं जात आहे. तपास यंत्रणांचा वापर करून विरोधकांचा आवाज दडपला जात आहे. ९७ टक्के कारवाया या विरोधी पक्षातील नेत्यांवर केल्या जात आहेत. परंतु यातील गुन्हा सिद्ध होण्याचा दर २ ते ३ टक्केच आहे. अजित पवारांबाबत पंतप्रधान काय बोलले होते? ७० हजार कोटींचा घोटाळा करणारे नॅशनल करप्शन पार्टी असं विधान करतात. त्यानंतर ४८ तासांत अजित पवारभाजपासोबतजातात आणि सत्तेत सहभागी होतात असं सांगत ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी सत्ताधारी भाजपावर निशाणा साधला. सर्वाधिक विश्वसनीय आणि प्रतिष्ठित लोकमत संसदीय पुरस्कार सोहळ्याचं यंदा ५ वं वर्ष आहे. दिल्लीत होणाऱ्या या सोहळ्यापूर्वी 'लोकमत नॅशनल कॉन्क्लेव्ह'चंआयोजन करण्यात आले आहे. त्यात 'धर्म आणि जातीत लोकशाही अडकलीय का' या विषयावर दिग्गज नेते विचारमंथन करत आहेत. या परिसंवादात शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी म्हणाल्या की, देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच १५० पेक्षा जास्त खासदारांचे निलंबन झाले हे योग्य होतं का?, ईडी, सीबीआय केवळ विरोधकांना टार्गेट करून दबावतंत्र वापरत आहेत. सरकारला घेरत असून जनतेचे प्रश्न विचारत असू तेव्हा सरकारकडून कारवाया होतात. त्यातून लोकशाही धोक्यात येते. देशातील लोकशाही संपली आहे. विरोधकांना जेलमध्ये टाकलं जातंय. विरोधक त्यांचा राग व्यक्त करत असतील तर त्यांचे निलंबन केले जाते. लोकशाहीत प्रत्येकाला त्याचे मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. जेव्हा मी संसदेत जाते, एखादा प्रश्न विचारते. पंतप्रधान म्हणतात, मी भ्रष्टाचारांविरोधात आहेत. ईडी, सीबीआयच्या तपासात ४ पटीने वाढ झाली. पण जे जे सत्ता पक्षात जातायेत त्यांना क्लीनचीट देण्याचं काम कोण करतंय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच गेली २ वर्ष मुंबई महापालिकेत निवडणूक झाली नाही. ५ राज्याच्या बजेट एवढे महापालिकेचे बजेट आहे. जे जे उद्धव ठाकरेंना सोडून जात आहेत त्या माजी नगरसेवकांना ५-५ कोटी फंडातून दिले जातात. आम्ही विरोधात आहोत म्हणून निधी दिला जात नाही. तुम्ही २ कोटी रोजगार देणार होता त्याचे काय झाले? अग्निवीरबाबत युवक आंदोलन करतायेत. महिला कुस्तीपटू विरोधात आंदोलन करत होते त्यांच्यावर लाठीचार्ज झाला. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू असं सांगितले. पण शेतकऱ्यांविरोधात काळे कायदे आणले. त्याविरोधात आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना दहशतवादी ठरवलं जाते. हे मुद्दे आम्ही संसदेत उपस्थित करायला गेलो तर आमचं निलंबन केले जाते असा आरोप प्रियांका चतुर्वेदी यांनी केला. दरम्यान, जे.पी नड्डा यांनी म्हटलं होतं, देशात केवळ एकमेव पक्ष राहिल तो म्हणजे भाजपा, याचा अर्थ देश हुकुमशाहीच्या दिशेने वाटचाल करत आहे. संसदेत काही लोक घुसखोरी करतायेत, जर त्यांच्या हातात बंदूक असती तर काय केले असते? मागील वेळी संसदेवर दहशतवादी हल्ला झाला. तेव्हा विरोधी पक्षाचं ऐकून सरकारनं उत्तर दिले होते. त्यावेळीही भाजपाचं सरकार होते आणि आजही त्यांचे सरकार आहे. संसदेत जर कुणी प्रश्न विचारले तर त्याला तुम्ही निलंबित करणार? सरकारने लोकशाहीचा आदर केला पाहिजे. सत्तेत असणाऱ्यांनी प्रत्येकाचे ऐकून घेतले पाहिजे. या सरकारला ३५ टक्के लोकांनी मतदान केले पण ६५ टक्के लोकांनी मतदान केले नाही. तुमचे कितीही बहुमत असले तरी लोकशाहीत विरोधकांचे ऐकले पाहिजे.

विरोधी पक्षाचीही मोठी जबाबदारी असते. लोकांचे प्रश्न आम्ही संसदेत मांडू शकतो असंही चतुर्वेदी यांनी सांगितले....तर आम्ही नक्कीच विजयी होऊमहाराष्ट्रात भाजपाविरोधी वातावरण आहे त्यामुळे एका लोकसभा मतदारसंघात खासदाराच्या निधनानंतरही पोटनिवडणूक घेतली जात नाही. भाजपा आणि मिंदे गटाला भीती वाटत आहे. वाढती महागाई, बेरोजगारी यावर कुठलेही माध्यम चर्चा करत नाही. वर्ल्ड प्रेस फ्रिडम रँकिंगमध्ये भारतचा नंबर घसरत आहे. वर्ल्ड हंगर इंडेक्स येते,

# पुण्यातील त्या हल्ल्याच्या निषेधार्थ साताऱ्यात जोरदार निदर्शने

**(अजित जगताप)**

**सातारा :** पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्रामध्ये अंतर्गत परीक्षा सुरू असताना विद्यार्थ्यांच्या नाटकाचे सादरीकरण सुरू होते. त्यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी कलाकारांवर हल्ला केला. विभाग प्रमुखांशी अर्वाच्च भाषेत बोलले याच्या निषेधार्थ व कलाकारांवरील पोलीस कारवाईच्या निषेधार्थ सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सातारच्या लोकशाहीप्रेमी रंगकर्मी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने काळे झेंडे दाखवून जोरदार निदर्शने करण्यात आली. कलाक्षेत्रात झुंडशाही करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

सातारा येथील लोकशाहीप्रेमी , अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते , रंगकर्मी कलाकार व सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने आज दुपारी सातारा जिल्हाधिकारी कार्यालया समोर काळ्याफिती बांधून व काळे झेंडे फडकावून जोरदार निदर्शने करण्यात आली यावेळी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटणाऱ्या प्रवृत्तींचा तसेच विद्यार्थ्यांवरील पोलिसी कारवाईचा निषेध करण्यात आला.

निदर्शने करणाऱ्यांमध्ये ड. राजेंद्र गलांडे , ड. वर्षा देशपांडे , विजय मांडके , मीनाज सय्यद , प्रकाश खटावकर , शशिकांत गाडे , मधुकर फल्ले , कैलास जाधव , ड. रुकसार आतार , प्रदीप मोरे , सलीम आतार , ड वसंत नलावडे आदी सहभागी झाले होते

महाराष्ट्राचे राज्यपाल यांना सातारा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात असे म्हटले आहे की ललित कला केंद्रावरील हल्ला हा विद्यापीठाच्या शैक्षणिक स्वायततेवर आक्रमण करणारा आहे. शैक्षणिक परिसरात हिंदुत्ववादी , अभाविप आणि तत्सम संघटनांनी त्यांच्या विरोधी विचाराच्या विद्यार्थी संघटना व गटांवर हिंसक हल्ले केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत अशा घटना म्हणजे लोकशाही व्यवस्थेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करण्याचा आक्रमक प्रयत्न आहे तसेच कायदा व सुव्यवस्थेचे उल्लंघन करणाऱ्या या घटना आहेत म्हणून आपण लोकशाही अभिव्यक्ती व विचार स्वातंत्र्याचे रक्षण यासाठी सक्रिय हस्तक्षेप करावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

शिष्टमंडळाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनावर सह्या करणाऱ्यांमध्ये वनिता कांबळे , तौसिफ शेख , स्वाती बल्लाळ , काशिनाथ जावळे , कविता बनसोडे , मालती जावळे , अजित सोनवणे , डॉ रमाकांत साठे आदींचा समावेश आहे.



विजेत्या माऊली कोकाटे यास विजेतेपद पारितोषिक देताना गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी, सदाशिव पवार, राजेंद्र माने व अन्य

# औंधच्या मैदानात माऊली कोकाटे गुणांवर विजयी

## हजारो कुस्तीशौकीनांची उपस्थिती श्री यमाई यात्रेनिमित्त कुस्ती मैदान

**औंध :** औंध येथील कुस्ती मैदानात माऊली कोकाटे (पुणे) विरुद्ध विशाल भोंदू (हरियाणा) यांच्यात चुरशीची लढत झाली. सुमारे वीस मिनिटे झालेल्या लढतीनंतर कुस्ती गुणांवर लावण्यात आली. माऊलीने गुण घेऊन भोंदूवर मात केली. यावेळी मैदानात कुस्तीशौकीनांनी जल्लोष केला.

श्रीयमाईदेवी यात्रेनिमित्त देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ औंध आणि श्रीमंत राजेसाहेब तालिम संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी, माजी सभापती संदीप मांडवे, सपोनि सी. व्ही. केंद्रे,हणमंतराव शिंदे, राजेंद्र माने, गणेश देशमुख, उद्धव माने, संतोष शिंदे , अनिल माने, तानाजी इंगळे, शैलेश मिठारी,संतोष भोसले, सदाशिव पवार,वसंत जानकर,किसन आमले,किसन तनपुरे,दिपक कदम,प्रा. संजय निकम, दीपक कर्पे, संतोष जायकर,प्रदीप हजारे,गणेश हरिदास,सदाशिव इंगळे, शहाजी यादव रामभाऊ भोकरे, डॉ अनिल खाडे,रमेश चव्हाण, दिनकर शिंगाडे, सदाशिव इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संदीप मोटे(सांगली)याने हितेशकुमार हरियाणा याला पोकळ घिस्सा डावावर आसमान दाखवले. सतपाल सोनटक्के विरुद्ध सागर तामखडे यांच्यात झालेल्या अटीतटीच्या लढतीत सतपाल सोनटक्के गुणावर विजयी झाला.प्रशांत शिंदे जाखणगाव याने प्रविण सरक कोल्हापूर याला गुणांवर नमवले. प्रशांत जगताप विरुद्ध समीर शेख लढतीत समीरने प्रशांतला धूळ चारली.धीरज पवार पिंपरी याने वैभव रासकरचा (कडेगांव) हप्ते डावावर पराभव केला. मनोज कदम नांदोशी याने सुनिल करवते याला नमवले.

यावेळी मैदानात रितेश सर्वगोड (येळीव) संग्राम सुर्यवंशी (लांडेवाडी),अक्षय मांडवे (नांदोशी)कुणाल माने (वरुड) छोटा मल्ल निखिल माने (सांगली),विश्वजीत आमले,प्रतीक इंगळे, सनी इंगळे, सोहेल शेख (औंध), शिवराज बर्गे (सांगली), हर्षल पाटील (जायगाव), पृथ्वीराज सगरे, विजय चन्ने (कुंडल), शाहरुख मुलाणी, राज माने, अनिकेत मगर,रोहन चव्हाण, महिला मल्ल वेदांतिका पाटील, वैष्णवी खैरमोडे आदी मल्लानी चटकदार कुस्त्या करून उपस्थितांची वाहवा मिळविली.

# अधिकारी विना पाटण तालुका पोरका, अधिकारीच यायला धजावेणा

## चार नायब तहसिलदार जागा रिक्त

## प्रांताधिकारी यांना सहा दिवस निवडणूक प्रशिक्षण

## तालुक्यातील विद्यार्थ्यांसह जनतेची कामे खोळंबली

**पाटण :** अति दुर्गम अशी ओळख असलेल्या व राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री आणि सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभुराज देसाई यांच्या मतदार संघात शासकीय अधिकारी यायला धजावत नसल्याचे चित्र आहे. पाटण तालुका म्हणल की कोणी अधिकारी यायलाच तयार नाहीत. असलेले अधिकारी स्वतः ची बदली करून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. पाटणचे तहसिलदार रमेश पाटील यांनी पुणे येथे तर उपविभागीय पोलिस अधिकारी विवेक लावंड यांनी नुकतीच बदली करुन घेतली. यासह पोलिस निरीक्षक विवेक पाडळे, सहाय्यक पोलिस निरिक्षक महेश पाटील यांची पंधरा दिवसापूर्वीच बदली झाली आहे. मात्र त्यांच्या जागेवर नवीन अधिकारी यायला तयार नसल्याने या दोन्ही अधिकाऱ्यांना पदभार सोडता येत नाही.

पाटण तालुका आठ विभागात विभागला गेला आहे. हे आठही विभाग डोंगर दुर्गम आहेत. दुर्गम विभागातून सर्वसामान्य लोकांनी, विद्यार्थ्यांनी शासकीय कामासाठी पाटणला यायचं म्हणल तर आक्खा दिवस मोडावा लागतो.



पाटणला आलेच तर काम होईल याची शास्वती नाही. कारण कार्यालयात अधिकारीच हजर नसल्याच्या तक्रारी लोकांच्या वाढल्या आहेत. अधिकारी हजर असलेच तर सततच्या आढावा बैठका, मिटींगा यात त्यांचा आठवडा जात असल्याचे वास्तव आहे. अशावेळी एका कामाला अनेकदा हेलपाटे मारण्याची वेळ सर्वसामान्य लोकांच्या वर येत आहे.

सद्या तर तहसिल कार्यालयाची अवस्थाच बिकट आहे. चार नायब तहसिलदार यांच्या जागा आसताना गेल्या वर्षभरापासून या सर्व जागा रिक्त आहेत. तर तहसिलदार यांनी इथला दबाव आणि कारभाराला कंटाळून कार्यकाळ पुर्ण होण्याच्या आत एक वर्ष आधी बदली करून घेतली. सद्या पाटणच्या तहसिल कार्यालयाला कारभारीच नाही. यामुळे सर्वसामान्य नागरिक यांची शासकीय तर विद्यार्थी यांची शैक्षणिक कामे रखडलेली आहेत. सद्या जनतेच्या व विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानाला जबाबदार कोण..?

पाटण तालुक्यात राजकीय नेत्यांचा विकास कामावरून श्रेयवाद होताना अनेकदा जनतेने पाहीला आहे. मात्र शासकीय कार्यालयात अधिकारी विना जनतेचे होणारे नुकसानाच्या बाबतीत कोणतेच राजकीय पक्ष, नेते, संघटना पुढे येताना दिसत नाहीत. सद्या एकतर्फी हम बोले सो कायदा अशी परिस्थिती निर्माण झाली असून जे आहेत ते लिपिका पासून ते अधिकाऱ्यां पर्यंत सर्वजण दबावाखाली काम करत असल्याचे बोलले जात आहे. कमी कर्मचारी वर्ग आणि अधिकारी नसल्याने विद्यार्थ्यांसह जनतेची कामे रखडली जात आहेत.